दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३११ I मंगळवार २५ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# राज्यातील धरणांमध्ये ७४.८८ टक्के पाणीसाठा

## मराठवाड्याची स्थिती चिंताजनक: श्रावण सरींकडून शेतकऱ्यांना आशा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील प्रमुख मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये २४ ऑगस्ट २०२६ अखेर एकूण ७४.८८ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. हा साठा सुमारे १,०७९.२६३ टीएमसी इतका आहे. गतवर्षी याच दिवशी राज्यातील उपयुक्त पाणीसाठा ८१.२१ टक्के म्हणजेच १,१७०.५० टीएमसी होता. यंदा गतवर्षीच्या तुलनेत सुमारे ९१.२४ टीएमसीने पाणीसाठा कमी असला, तरी पावसाळ्याचा कालावधी अद्याप शिल्लक असल्याने राज्यातील बहुतांश धरणे पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता आहे, अशी माहिती जलसंपदा अभ्यासक तथा निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी दिली.

राज्यातील सहा महसुली विभागांचा विचार करता कोकण विभागात सर्वाधिक ९०.२४ टक्के, तर पुणे विभागात ८८.९० टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. नाशिक विभागात ७९.२५ टक्के, अमरावतीत ६२.४० टक्के, नागपूरमध्ये ६०.९३ टक्के, तर मराठवाड्यात सर्वाधिक कमी म्हणजे सुमारे ५०.०३ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे मराठवाड्याची पाणीस्थिती अद्याप चिंताजनक असल्याचे चकोर यांनी सांगितले. संगमनेर तालुक्यातील निमोण-तळेगाव या दुष्काळी भागासाठी महत्त्वाच्या भोजापूर धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणातील ओव्हरफ्लोचे पाणी लाभक्षेत्रातील तसेच निळवंडेच्या पाण्यापासून वंचित गावांमधील लघुपाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव तसेच दगडी **(पान ४ वर)**

(पान ४ वर)

### अहिल्यानगरमध्ये ९२.५८ टक्के साठा

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या १३ प्रकल्पांमध्ये सुमारे ४८.२३९ टीएमसी म्हणजे ९२.५८ टक्के पाणीसाठा झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे २.४०० टीएमसीने कमी आहे. उत्तर अहिल्यानगरमधील भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि आढळा हे प्रकल्प जवळपास पूर्ण क्षमतेने भरले आहेत. मात्र दक्षिण अहिल्यानगरमधील सीना, खैरी, मांडओहोळ आणि घाटशीळ-पारगाव या प्रकल्पांमध्ये सरासरी सुमारे ३१ टक्केच पाणीसाठा आहे. उर्वरित पावसाळा आणि परतीच्या पावसामुळे या प्रकल्पांमध्येही पाणीसाठा वाढण्याची शक्यता आहे.

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांची स्थिती

भंडारदरा ९९.७६ टक्के, निळवंडे ९९.९२ टक्के, मुळा ९७.३२ टक्के आणि आढळा १०० टक्के भरले आहे. पिंपळगाव खांडमध्येही १०० टक्के साठा झाला आहे. विसापूरमध्ये ७२.७४ टक्के, सीना ३४.१३ टक्के, खैरी १८.६४ टक्के, मांडओहोळ १७.८५ टक्के, तर घाटशीळ-पारगावमध्ये केवळ १३.२७ टक्के पाणीसाठा आहे.

### घाटघरमध्ये ४१८० मिमी, लोणीत केवळ १४० मिमी पाऊस

यंदा महाराष्ट्राची चेरापुंजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घाटघर येथे आतापर्यंत ४१८० मिमी पाऊस झाला आहे. राज्यातील सर्वाधिक पर्जन्यमान मुळशी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुमारे ६९५३ मिमी नोंदवले गेले आहे. त्याउलट अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे केवळ १४० मिमी पाऊस झाला आहे. मात्र पावसाळ्याचा कालावधी अद्याप शिल्लक असल्याने पर्जन्यमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

# ६ लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ५,०८६ कोटींची कर्जमाफी

- दुसऱ्या टप्प्यात राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर निधी वर्ग
- आतापर्यंत १२ लाख ५८ हजार शेतकऱ्यांना १०,११५ कोटींचा लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर : महायुती सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील ६ लाख ३६ हजार ३६ पात्र शेतकऱ्यांना ५ हजार ८६ कोटी रुपयांचा कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या निधीचे वितरण करण्यात आले.**



यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी पहिल्या टप्प्यात ५ हजार २९ कोटी रुपये वितरित करून ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला होता. दोन टप्प्यांत आतापर्यंत १२ लाख ५८ हजार २४३ शेतकऱ्यांना १० हजार ११५ कोटी रुपयांचा कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे.

राज्य सरकारच्या या योजनेत सुमारे ३२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाणार असून, २३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. एकूण सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणे अपेक्षित आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकारला सुमारे ४० हजार ९८० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. योजनेतील पात्र लाभार्थ्यांची संख्या आणि लाभ वितरणाची प्रक्रिया सातत्याने अद्ययावत होत असून, प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले.

कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी दोन्ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर शेतकरी संघटनांकडून झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला. २०१९च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही आता दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मंत्रिमंडळाचे चार महत्त्वाचे निर्णय

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण, महसूल व वन तसेच विधि व न्याय विभागाशी संबंधित चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू आणि त्यांच्या मार्गदर्शकांना देण्यात येणाऱ्या रोख बक्षिसांच्या धोरणात सुधारणा करण्यात आली.

नागपूर येथे लता मंगेशकर विद्यापीठ स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच सांगली जिल्ह्यातील जत नगरपरिषदेला प्रशासकीय इमारतीसाठी २ हजार ५८५ चौ. मीटर शासकीय जमीन देण्यास मान्यता देण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू करण्यासह आवश्यक पदे व खर्चाच्या तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली.

### डॉ. बाळासाहेब विखे पाटील खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाला मंजुरी



**अहिल्यानगर :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहिल्यानगरसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, डॉ. बाळासाहेब विखे पाटील खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. या विद्यापीठात वैद्यकशास्त्र, दंतवैद्यक, फिजिओथेरपी आणि नर्सिंग या आरोग्यविषयक विद्याशाखांमध्ये पदवी, पदव्युत्तर तसेच सुपर स्पेशॅलिटी अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात आरोग्य शिक्षणाच्या सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून, वैद्यकीय आणि आरोग्यविषयक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना जिल्ह्यातच अधिक संधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## महत्त्वाचे..

### टाटा ट्रस्टच्या मदतीने ९ रुग्णांना ८९.६० लाखांची मदत

**मुंबई :** यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रियांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि टाटा ट्रस्ट यांच्यात झालेला सामंजस्य करार गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या पहिल्या करारांतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार तसेच मेंदूवरील शस्त्रक्रियांसारख्या गंभीर आणि खर्चिक उपचारांना मदत मिळाली.आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्रातील संस्थांमध्ये समन्वय वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# अमरावतीच्या स्त्री रुग्णालयात अग्नितांडव!

## नवजात कक्षातील आगीत तीन चिमुकल्यांचा मृत्यू; ३६ बालकांना वाचविण्यात यश, सहा जखमींवर उपचार

- मृत चिमुकल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत
- उच्चस्तरीय चौकशीचे आदेश
- दोषींवर कठोर कारवाईचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरावती :** अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास भीषण आग लागून तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. व्हेंटिलेटरमध्ये झालेल्या स्फोटानंतर आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेच्या वेळी विभागात ३९ नवजात बालकांवर उपचार सुरू होते. रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू करून ३६ बालकांना सुरक्षित बाहेर काढले, तर सहा बालकांना पुढील उपचारांसाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलविण्यात आले.

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या बालकांमध्ये पूजा बोरगे (रा. पुलगाव, वर्धा) यांचा मुलगा, गायत्री प्रफुल चोपडे (रा. मुरखेड, ता. अंजनगाव सुर्जी) यांचा मुलगा आणि किरण बेठेकर (रा. बोराळा, ता. चिखलदरा) यांची मुलगी यांचा समावेश आहे.

आग नेमकी कशामुळे लागली, तसेच रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणा आणि वैद्यकीय उपकरणांची देखभाल याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. घटनेनंतर सहा महिन्यांच्या आत अहवाल देण्याऐवजी तातडीने चौकशी सुरू करण्यात आली असून, सात सदस्यीय चौकशी समितीला अहवाल सादर करण्यासाठी आठ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, **(पान ४ वर)**

# सरसकट मराठ्यांना आरक्षण देणे अशक्य : केंद्रीय मंत्री रामदास आठवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी : राज्य सरकारने मराठा समाजास दहा टक्के आरक्षण दिल्या असून सारथीच्या माध्यमातून अनेक मराठ्यांच्या उन्नतीच्या योजना सरकार राबवत आहे सरसकट मराठ्यांना आरक्षण देणे हे शक्य होणार नसून ते कोर्टात रद्दबातल होते.**



ज्यांच्या कुणबी नोंदी सापडले आहे त्यांना प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे .त्यासाठी क्रिमिलियर ची मर्यादा असून सरसकट आरक्षण मागणे योग्य नसल्याचे केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी स्पष्ट केले .

ते काल अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्या शिर्डी येथे आले असताना त्यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषदेत विविध राजकीय व सामाजिक मुद्द्यांवर आपले मत स्पष्ट केले.

यावेळी बोलताना त्यांनी, चळवळीतील आपले सहकारी राजाभाऊ कापसे यांच्या निधनामुळे पक्षात मोठी हानी निर्माण झाली असल्याचे सांगत तीव्र दुःख व्यक्त केले. त्यांच्या जन्मगावी वाकडी या ठिकाणी जाऊन त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले असल्याचे त्यांनी नमूद केले. राजाभाऊ कापसे यांनी आतापर्यंत अनेक चांगली कामे केली असून, त्यांचा मनमिळाऊ स्वभाव आणि चळवळीतील मोठे योगदान कधीही विसरता येणार नाही, अशा शब्दांत त्यांनी आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांचे समवेत राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत **(पान ४ वर)**

## ऑडिओ क्लिप भोवली...

# पारनेरचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांची उचलबांगडी

रोहन उनवणे । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष बी. खेडकर यांच्याविरोधात गंभीर आरोप करणारी ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर जिल्हा पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. पोलीस निरीक्षक खेडकर यांची तात्पुरत्या स्वरूपात पोलीस नियंत्रण कक्ष, अहिल्यानगर येथे बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याकडे पारनेर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी काढले आहेत.




पारनेर पोलीस ठाण्यातील एका प्रकरणात गुन्ह्यात नाव समाविष्ट न करण्यासाठी दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित आर्थिक मागणीसंदर्भातील संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली. त्यामुळे पोलीस दलाच्या **(पान ४ वर)**

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताचा ४९२ खेळाडूंचा भव्य ताफा

## ३५ क्रीडा प्रकारांत भारताचे आव्हान; २६५ पुरुष आणि २२७ महिला खेळाडूंचा समावेश

गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताचा ४९२ खेळाडूंचा ताफा सज्ज झाला आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने भारतीय खेळाडूंच्या पथकाला प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी दिली असून, या पथकात २६५ पुरुष आणि २२७ महिला खेळाडूंचा समावेश आहे. भारतीय खेळाडू ३५ क्रीडा प्रकारांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. आयची-नागोया आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. भारताच्या पथकात ऑलिम्पिक पदकविजेते, जागतिक स्तरावरील नामांकित खेळाडू तसेच नवोदित आणि युवा खेळाडूंचा समावेश असल्याने यंदाच्या स्पर्धेत भारताकडून मोठ्या पदक अपेक्षा व्यक्त होत आहेत.

### ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक ७३ खेळाडू

भारतीय पथकातील सर्वाधिक खेळाडू ॲथलेटिक्समध्ये असून एकूण ७३ खेळाडूंचा समावेश आहे. यात ३५ पुरुष आणि ३८ महिला खेळाडू आहेत.

दोन वेळचे ऑलिम्पिक पदकविजेते आणि भालाफेकमधील भारताचा स्टार नीरज चोप्रा हे या संघाचे प्रमुख आकर्षण असतील. त्यांच्यासोबत लांब उडीपटू मुरली श्रीशंकर, लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंग, डेकॅथलॉनपटू तेजस्विन शंकर आणि १०० मीटर अडथळा शर्यतीतील ज्योती याराजी यांच्याकडूनही भारताला पदकांची अपेक्षा आहे.नीरज चोप्रा यांच्यासाठी ही स्पर्धा विशेष महत्त्वाची ठरणार असून, आशियाई क्रीडा स्पर्धेत सलग तिसरे सुवर्णपदक मिळवण्याचे त्यांचे लक्ष्य असेल.

### हॉकी, क्रिकेट आणि नेमबाजीतही मोठी ताकद

भारताने हॉकी, क्रिकेट आणि नेमबाजी या प्रमुख क्रीडा प्रकारांमध्येही मोठे संघ मैदानात उतरवले आहेत. उपलब्ध मंजूर यादीच्या आकडेवारीनुसार हॉकीमध्ये ४०, नेमबाजीत ३० आणि क्रिकेटमध्ये ३० खेळाडूंचा समावेश आहे.क्रिकेटच्या पुरुष आणि महिला दोन्ही ढ२० संघांना मंजुरी मिळाली आहे. पुरुष संघात जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, अभिषेक शर्मा, ईशान किशन, वॉशिंग्टन सुंदर, तिलक वर्मा, संजू सॅमसन आणि युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे.महिला संघात हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, रिचा घोष, दीप्ती शर्मा, राधा यादव, रेणुका ठाकूर यांच्यासह अन्य प्रमुख खेळाडू आहेत.

### बॅडमिंटनमध्ये स्टार खेळाडूंची फौज

भारतीय बॅडमिंटन संघात २० खेळाडूंचा समावेश आहे. ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, एच. एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत, सात्विकसाईराज रंकीरेड्डी, चिराग शेट्टी आणि आयुष शेट्टी यांच्याकडून भारताला मोठ्या अपेक्षा आहेत.महिला संघात सिंधूसोबत उन्नती हुड्डा, तन्वी शर्मा, देविका सिहाग, ईशाराणी बरुआ यांचा समावेश आहे. महिला दुहेरीत गायत्री गोपीचंद-ट्रीसा जॉली ही जोडी भारताचे प्रमुख आव्हान असेल.पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारताची आघाडीची जोडी पदकासाठी मैदानात उतरेल.

### बॉक्सिंगमध्ये ११ खेळाडू

भारतीय बॉक्सिंग संघात ११ खेळाडूंचा समावेश आहे. पुरुषांमध्ये सचिन, सुमित, अंकुश, नरेंद्र, जडुमनी सिंग आणि कपिल पोखरिया यांचा समावेश आहे.महिलांच्या गटात लव्हलिना बोर्गोहेन, प्रीती पवार, साक्षी, परवीन आणि प्रिया भारताचे प्रतिनिधित्व करतील.विशेषतः लव्हलिना बोर्गोहेन यांच्याकडून भारताला पदकाची अपेक्षा आहे.

### कबड्डीत भारताचे लक्ष्य वर्चस्व कायम ठेवण्याचे

कबड्डी हा भारताचा पारंपरिक बलस्थान असलेला क्रीडा प्रकार आहे. यंदाच्या आशियाई स्पर्धेसाठी पुरुष आणि महिला अशा दोन्ही संघांचा समावेश असून, एकूण २४ खेळाडू कबड्डीमध्ये सहभागी होणार आहेत. पुरुष संघात अयान लोहचब, देवांक दलाल आणि अनुभवी पवन सेहरावत यांसारख्या खेळाडूंचा समावेश असल्याने भारताचे आव्हान मजबूत मानले जात आहे.

### कुस्तीमध्ये १६ खेळाडू

कुस्तीमध्ये भारताचे १६ खेळाडू मैदानात उतरतील. उपलब्ध माहितीनुसार या संघात १० पुरुष आणि ६ महिला खेळाडू आहेत. काही वजनगटांमध्ये डोपिंग प्रकरणांमुळे भारताचे कोटा स्थान कमी झाले असून, पुरुषांच्या फ्रीस्टाइल ८६ किलो आणि ग्रीको-रोमन १३० किलो गटात भारताचे **(पान ४ वर)**

# शिक्षण हा हक्क; मग त्याच्या वाट्याला उपेक्षा का ?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

भारताच्या संविधानाने प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार दिला आहे. शिक्षण हा केवळ सरकारी योजनेचा विषय नाही, तर तो मुलाच्या भवितव्याचा आणि राष्ट्राच्या प्रगतीचा मूलभूत आधार आहे. त्यामुळे प्रत्येक मुलाला सुरक्षित शाळा, स्वच्छ पिण्याचे पाणी, वापरण्यायोग्य स्वच्छतागृह, बसण्यासाठी बाक, शिकण्यासाठी पोषक वातावरण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक मिळणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र, महाराष्ट्रातील अनेक सरकारी शाळांची आजची अवस्था पाहिली तर संविधानाच्या या अपेक्षेपासून आपण किती दूर आहोत, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे.

याच वास्तवावर प्रकाश टाकणाऱ्या दोन घटना सध्या चर्चेत आहेत. एका बाजूला कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सरकारी शाळांच्या दुरवस्थेविरोधात आंदोलन उभे केले असून, राज्यातील शाळांची वास्तविक स्थिती जनतेसमोर जाहीर करण्याची मागणी केली आहे. दुसऱ्या बाजूला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांनी धुळे जिल्ह्यातील एका कार्यक्रमात शिक्षणाच्या बजेटकडे आणि शाळांच्या मूलभूत सुविधांकडे लक्ष वेधले आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित हजारो कोटी रुपयांच्या खर्चाची तुलना करताना त्यांनी शिक्षणाला मिळणाऱ्या निधीबाबत व्यक्त केलेली चिंता ही केवळ एका कार्यक्रमातील टिप्पणी म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. ती राज्याच्या विकासाच्या प्राधान्यक्रमावर विचार करायला भाग पाडणारी बाब आहे.

कुंभमेळा असो, रस्ते असोत, कॉरिडॉर असोत किंवा अन्य पायाभूत सुविधा, विकासासाठी त्यांची गरज नक्कीच आहे. धार्मिक पर्यटन, वाहतूक, पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या दृष्टीने मोठ्या प्रकल्पांना महत्त्व आहे. पण विकासाच्या या धावपळीत भविष्यातील पिढी घडविणाऱ्या शाळा मागे पडत असतील, तर विकासाची दिशा तपासण्याची वेळ आली आहे. इमारती उभ्या राहतील, रस्ते रुंद होतील, कॉरिडॉर तयार होतील; पण त्या रस्त्यांवरून पुढे जाणाऱ्या पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले नाही, तर त्या विकासाचा अंतिम लाभ कोणाला मिळणार?

आज अनेक सरकारी शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वर्गखोल्या, बाके, संगणक, डिजिटल साधने आणि क्रीडा सुविधा यांसारख्या मूलभूत बाबींची कमतरता असल्याचे आरोप केले जात आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत असल्याचे चित्र समोर येते. विद्यार्थ्यांना जमिनीवर झोपावे लागणे आणि त्यातून सर्पदंशासारख्या दुर्घटनेत मुलींचा मृत्यू होणे ही घटना कोणत्याही संवेदनशील समाजाला हादरवून सोडणारी आहे. शाळा ही मुलांसाठी ज्ञानाचे मंदिर असण्याआधी सुरक्षित जागा असली पाहिजे.

अभिजीत दिपके यांनी शिक्षण मंत्र्यांना पत्र लिहून सरकारी शाळांची वास्तविक स्थिती जाहीर करण्याची मागणी केली आहे. ही मागणी राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. राज्यात नेमक्या किती शाळांमध्ये संगणक आहेत? किती शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाची सुविधा प्रत्यक्ष सुरू आहे? किती शाळांमध्ये वापरण्यायोग्य स्वच्छतागृहे आहेत? किती शाळांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध आहे? किती शाळांमध्ये खेळाचे मैदान आणि क्रीडा साहित्य आहे? किती वर्गखोल्या धोकादायक आहेत? किती शाळांना शिक्षकांची आवश्यकता आहे? या प्रश्नांची जिल्हानिहाय आणि शाळानिहाय आकडेवारी सरकारने जनतेसमोर ठेवली पाहिजे.

कारण समस्या मान्य केल्याशिवाय उपाययोजना होऊ शकत नाहीत. शिक्षणावरील खर्च हा खर्च नसून गुंतवणूक आहे. एखादा रस्ता बांधला तर त्याचा उपयोग काही दशके होतो; परंतु एका मुलाला दर्जेदार शिक्षण मिळाले तर त्याचा परिणाम त्या मुलाच्या संपूर्ण आयुष्यावर आणि पुढील पिढीवर होतो. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, शास्त्रज्ञ, प्रशासक, उद्योजक, शेतकरी आणि कुशल कामगार समाजातील प्रत्येक क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ शाळेतच तयार होते. त्यामुळे शिक्षणासाठी दिलेला प्रत्येक रुपया भविष्यातील सामाजिक आणि आर्थिक विकासात अनेक पटींनी परत येतो.

महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यात सरकारी शाळांबाबतची उदासीनता अधिकच चिंताजनक आहे. खासगी शाळांकडे जाण्याची आर्थिक क्षमता नसलेल्या कुटुंबातील मुलांसाठी सरकारी शाळा हा आशेचा आधार आहे. या शाळा कमकुवत झाल्या तर सर्वाधिक फटका गरीब, ग्रामीण, शेतकरी, मजूर आणि वंचित कुटुंबातील मुलांना बसतो. त्यामुळे सरकारी शाळा मजबूत करणे म्हणजे केवळ शिक्षण व्यवस्था मजबूत करणे नव्हे; तर सामाजिक समता मजबूत करणे होय.

यासाठी सरकारने शिक्षणाच्या अर्थसंकल्पातील तरतूद लक्षणीयरीत्या वाढवण्याची गरज आहे. केवळ नवीन घोषणा करून किंवा एखाद्या योजनेचे उद्घाटन करून शिक्षणव्यवस्था सुधारणार नाही. शाळांना आवश्यक निधी वेळेत मिळणे, शिक्षकांची रिक्त पदे भरणे, वर्गखोल्यांची दुरुस्ती, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, क्रीडा सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची हमी यासाठी स्वतंत्र आणि निश्चित निधीची आवश्यकता आहे. सरकारने आता एक ठोस 'शाळा पायाभूत सुविधा हमी कार्यक्रम' राबवावा. प्रत्येक सरकारी शाळेचे सर्वेक्षण करून तिची मूलभूत गरज निश्चित करावी आणि त्यासाठी कालबद्ध निधी उपलब्ध करून द्यावा. या निधीचा खर्च आणि कामाची प्रगती ऑनलाइन सार्वजनिक करावी. त्यामुळे जनतेला त्यांच्या गावातील शाळेवर किती निधी आला, किती खर्च झाला आणि कामाची स्थिती काय आहे, हे सहज कळेल.

कुंभमेळा आणि अन्य मोठे प्रकल्प थांबवण्याचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो प्राधान्यक्रमाचा आणि संतुलनाचा. धार्मिक श्रद्धा, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास यांच्यासोबत मानवी विकासालाही समान महत्त्व मिळाले पाहिजे. हजारो कोटींच्या प्रकल्पांमध्ये शिक्षणासाठी पुरेसा आणि दीर्घकालीन निधी राखणे ही सरकारची नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी आहे. न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांनी व्यक्त केलेली चिंता आणि सीजेपीने उपस्थित केलेले प्रश्न सरकारने राजकीय टीका म्हणून न पाहता आत्मपरीक्षणाची संधी म्हणून स्वीकारावेत. महाराष्ट्राची खरी श्रीमंती उंच इमारतींमध्ये नव्हे, तर ज्ञानाने समृद्ध झालेल्या मुलांमध्ये आहे.आज शाळेच्या छताला गळती असेल तर उद्या त्या मुलाच्या स्वप्नांनाही गळती लागेल. आज बाक नसेल तर उद्या संधीही नसेल. आज शिक्षक आणि सुविधा नसतील तर उद्या सक्षम नागरिक घडणार नाहीत. म्हणूनच शासनाने आता जागे होण्याची गरज आहे.कुंभमेळ्याला कोट्यवधींचा खर्च होऊ शकतो; विकासकामांसाठी हजारो कोटींची तरतूद होऊ शकते; मग महाराष्ट्राच्या मुलांच्या शिक्षणासाठी निधीची कमतरता का भासावी?हा प्रश्न केवळ सरकारला नाही, संपूर्ण समाजाला आहे. आणि या प्रश्नाचे उत्तर आता घोषणांमध्ये नव्हे, तर प्रत्येक सरकारी शाळेच्या बदललेल्या चेहऱ्यात दिसले पाहिजे.

# नेवासा येथे 'ज्ञानेश्वरी चिंतन'च्या दोन ग्रंथांचे पूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या नेवासा येथील पैस खांब मंदिरात 'ज्ञानेश्वरी चिंतन' खंड-१ 'तत्त्वज्ञान प्रबोध' व खंड-२ 'जीवन प्रबोध' या ग्रंथांचे संत-महंतांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

देवगड गुरुदेव दत्तपीठाचे प्रमुख राष्ट्रसंत भास्करगिरीजी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख वेदांताचार्य ह.भ.प. देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री आणि सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांच्या हस्ते ग्रंथपूजन झाले.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान व आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी भगवानगडाचे महंत गणेश महाराज शास्त्री, स्वामी यज्ञेश्वर महाराज जोशी, भागवताचार्य योगेश महाराज पवार, नानासाहेब जाधव यांच्यासह विविध संत-महंत व मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज यांनी ज्ञानेश्वरी ही माऊलींच्या अंतःकरणातील प्रकाशरूप भाव असल्याचे सांगितले. तर देविदास महाराजांनी ज्ञानेश्वरी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा ग्रंथ असून त्यातील तत्त्वज्ञान हा गाभा असल्याचे स्पष्ट केले. ग्रंथनिर्मितीस योगदान देणाऱ्या माऊलीभक्तांचा यावेळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. सुदाम देवखिळे यांनी केले.



## काल्पनिक वेतनवाढीचा न्यायालयीन निर्णय हे कर्मचाऱ्यांचे यश : ॲड. शिवकुमार मठपती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

नेवासा : जिल्हा परिषद अहिल्यानगर येथील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुलै महिन्यानंतरची काल्पनिक वेतनवाढ देण्याबाबत छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने ऐतिहासिक निकाल दिला. सहाव्या वेतन आयोगाच्या पोटी मिळालेली ही काल्पनिक वेतनवाढ हे आपले न्यायालयीन यश असून, यापुढेही कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कायदेशीर प्रक्रियेतून चांगले निर्णय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन नामवंत वकील अँड. शिवकुमार मठपती यांनी केले. कागदावर वेतनवाढ लागू, पण मागील कालावधीचे वाढीव पैसे प्रत्यक्ष मिळत नाहीत. अशा वेतन वाढीबाबत न्यायालयीन लढ्यात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने वकीलपत्र स्वीकारून प्रभावी बाजू मांडल्याबद्दल ॲड. मठपती यांचा देवगड येथे सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त गटविकास अधिकारी सुरेश पाटेकर होते. व्यासपीठावर बन्सीभाऊ आगळे, साधना पुरकर, भाऊसाहेब पटारे व प्रमोद देशपांडे उपस्थित होते.



यावेळी अध्यक्ष सुरेश पाटेकर तसेच निवृत्त कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते अँड शिवकुमार मठपती यांचा सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना अँड मठपती म्हणाले, न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाला शासन निर्णयाची जोड मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मंत्रालयीन स्तरावर एकजूट दाखवून शासन निर्णय मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. शासन निर्णय झाल्यास या निकालाचा लाभ सर्व संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तर देऊन त्यांनी शंकांचे समाधान केले यावेळी राजेंद्र मोरगे,कृष्णा शिंदे,बन्सीभाऊ आगळे, भाऊसाहेब पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. न्यायालयीन निर्णयाचा लाभ उर्वरित पात्र कर्मचाऱ्यांनाही मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमास नेवासा तालुक्यासह राहता नगर श्रीगोंदा शेवगाव या तालुक्यातील राजेंद्र मोरगे,कांतीलाल कुंडारे,भाऊसाहेब औताडे, मोहम्मद शेख मणियार,इकबाल शेख, सुरेश पाटेकर,रविंद्र थावरे, साधना पुरकर, दत्तात्रय भालेराव, एकनाथ वाडगे, अशोक गुंजाळ, दिगंबर कोरडे, कल्पनाताई गायकवाड, जेम्स ससाणे, क्षीरसागर, संभाजी घोरपडे, अनंत सदनापूरकर,डॉक्टर शिंदे,कल्पना देवढे, विलासराव दातरंगे यांच्यासह नेवासा, श्रीरामपूर, राहता श्रीगोंदा कोपरगाव व राहुरी तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोघां भावांना शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : तुम्ही या रस्त्याने जायचे नाही, असे म्हणुन आरोपींनी संकेत सोळुंके या तरुणाला शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील मालुंजे खुर्द येथे घडली. संकेत सर्जेराव सोळुंके, (वय २७, रा. मालुंजे खुर्द, ता. राहुरी), या तरुणाने राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, संकेत सोळुंके यांच्या शेतात जाणेकरिता महेश बाळासाहेब बडाख, (रा. माहेगाव, ता. राहुरी) यांचे घरा समोरुनच रस्ता आहे. दि. २२ ऑगस्ट रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास संकेत सोळुंके व त्याचा चुलत भाऊ अशोक रावसाहेब सोळुंके असे दोघेजण शेतात जात असताना आरोपी अचानक समोर आले व शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारहाण केली. आरोपी म्हणाले, तुम्ही या रस्त्याने जावयाचे नाही, तुम्ही परत या रस्त्याने गेले तर तुम्हाला जिवे ठार मारुन टाकु, अशी धमकी दिली. घटनेनंतर संकेत सर्जेराव सोळुके याने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी महेश बाळासाहेब बडाख व संदिप सर्जेराव बडाख, दोघे रा. माहेगाव, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

## समता पतसंस्थेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आज नेवासा येथे स्नेहमेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ज्येष्ठ नागरिक ही समाजाची व राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे, ही भावना डोळ्यासमोर ठेवून नेवासा येथील समता पतसंस्थेच्या शाखेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचे जीवन अधिक सुखकर व आनंदी करण्यासाठी तसेच सर्व वयोगटातील नागरिकांना तणावमुक्त जीवनाचा आनंद घेता यावा, यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा स्नेहमेळावा मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता नेवासा येथील श्री मोहिनीराज मंगल कार्यालयात होणार आहे. या कार्यक्रमात प्रबोधन, मनोरंजन, जनजागृती तसेच विनोदी शैलीतील मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी 'आनंदी जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर सुप्रसिद्ध व्याख्याते श्री. अशोक देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन कसे जगावे, तसेच सर्व वयोगटातील नागरिकांनी हसत-खेळत तणावमुक्त जीवनाचा आनंद कसा घ्यावा, याबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत.

# राहुरीचे सहाय्यक निबंधक कार्यालय 'सहकाराला शिस्त लावणारे की भ्रष्टाचाराचे कुरण?'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : सहकारी संस्था व पतसंस्थांना शिस्त लावणे, नियमांची अंमलबजावणी करणे आणि सभासद-ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या राहुरी तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या कारभाराबाबत गंभीर आरोप व तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे 'सहकाराला शिस्त लावणारे कार्यालय की भ्रष्टाचाराचे कुरण?' असा सवाल सहकार क्षेत्रातून उपस्थित होत आहे.

नुकतेच नियुक्त झालेल्या सहाय्यक निबंधकांनी तालुक्यातीलसहकारी संस्था व पतसंस्थांच्या कर्मचाऱ्यांची कामे वाटून दिल्याचे सांगितले जात आहे. तसेच खासगी लेखापरीक्षकांकडून संस्थांचे लेखापरीक्षण करून घेण्याबाबत नवा पायंडा पाडला जात असल्याची तक्रार संस्था चालकांनी केली आहे. या प्रक्रियेला नेमका कायदेशीर आधार काय, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहार, कर्जवाटप आणि नियमपालनाची प्रभावी तपासणी होत नसल्याचा आरोप आहे. काही प्रकरणांत 'सर्व काही सुरळीत' असल्याचा दाखला मिळविण्यासाठी कथित आर्थिक मागण्या केल्या जात असल्याची तक्रार संस्था चालकांनी केली आहे. कर्जवसुलीशी संबंधित कलम १०१ अंतर्गत प्रकरणे पुढे नेण्यासाठी कथित 'रेट' ठरलेला असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

जप्त मालमत्तांचा ताबा घेण्यास विलंब, सुनावणीच्या तारखा वेळेवर न घेणे, प्रकरणे प्रलंबित ठेवणे तसेच वारंवार चालढकल केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. ठेवी परत मिळत नसल्याबाबत तक्रार घेऊन येणाऱ्या ठेवीदारांनाही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप आहे.

**ट्रॅपच्या प्रयत्नांबाबतही चर्चा**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कथित तीन वेळा ट्रॅपची तयारी झाल्याची, मात्र ती निष्फळ ठरल्याची चर्चा सहकार क्षेत्रात आहे. यामागे लेखापरीक्षण कार्यालयातील एका कर्मचाऱ्याची भूमिका असल्याचा आरोप असून, त्याचीही निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, आर्थिकदृष्ट्या सक्षम संस्थांनाच वारंवार तपासणीला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार आहे. या सर्व आरोपांची वरिष्ठ पातळीवरून स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सहकार क्षेत्रातून होत आहे. या आरोपांबाबत संबंधित सहाय्यक निबंधक कार्यालयाची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही.

## शिर्डीत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी घेतली नाना त्रिभुवन यांची सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले हे शिर्डी दौऱ्यावर आले असताना, त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (रिपाइं) शिर्डी शहर अध्यक्ष नाना त्रिभुवन यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. गेल्या काही दिवसांपासून पायाला जखम झाल्यामुळे नाना त्रिभुवन हे आजारी असून घरी विश्रांती घेत आहेत. याची माहिती मिळताच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली व त्यांना लवकरात लवकर बरे वाटावे, यासाठी सदिच्छा दिल्या. या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांच्या समवेत आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, आजारी असलेले शहर अध्यक्ष नाना त्रिभुवन यांचे वडील भिवाजी त्रिभुवन, मातोश्री, पत्नी यांनी त्यांचे स्वागत केले . केंद्रीय मंत्र्यांनी स्वतः निवासस्थानी येऊन तब्येतीची चौकशी केल्याबद्दल त्रिभुवन परिवाराने त्यांचे आभार मानले.



# हरिहर केशव गोविंद महाराजांना जलाभिषेक व शोभयात्रा आज सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** ग्रामदैवत हरिहर केशव गोविंद भगवान अखंड हरिनाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सवप्रसंगी दुसऱ्या सोमवारनिमित्त केशव गोविंद महाराज यांना जलाभिषेक करण्यात येऊन व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. आज मंगळवारी काल्याचे कीर्तन, महाआरती व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

बेलापूर येथील केशव गोविंद मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त हरिनाम सप्ताह, कीर्तन महोत्सव, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. आज दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त सकाळी पुणतांबा येथून कवडीने गोदाजल आणण्यात आले. कावडीत मोठया संख्येने युवक सहभागी झाले होते. यात तेरा वर्षीय राधेश सचिन शर्मा हा कुमारही सहभागी झाला. कावडीचे बेलापूर -ऐनतपूरचे ग्रामस्थ, हरिहर केशव गोविंद सप्ताह कमिटी तसेच सत्यमेव जयते सुप्रभात ग्रुपने स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते केशव गोविंद मंदिरापर्यंत कावडीची संवाद्य मिरवणूक काढण्यात आली.मंदिरात केशव गोविंद महाराजांना गोदाजलाचा अभिषेक करण्यात आला. तसेच दुपारी भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

आज मंगळवारी सकाळी दहा वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाआरती आणि महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सदरप्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहन हरिहर केशव गोविंद महाराज सप्ताह कमिटी, शेजआरती मंडळ,हरिहर महिला भजनी मंडळ तसेच बेलापूर- ऐनतपूर ग्रामस्थांनी केले आहे.

### कुंभमेळ्याच्या निधीतील 0.0१ टक्का शिक्षणासाठी दिला असता तरी

# निधीअभावी बंद पडलेल्या १०० ते १२५ मराठी शाळा वाचल्या असत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य सरकारकडून ३२ ते ३४ हजार कोटी रुपये, मतर कॉरिडॉर प्रकल्पांसाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. या प्रचंड निधीपैकी केवळ ०.०१ टक्के रक्कम जरी मराठी माध्यमाच्या शाळांसाठी खर्च केली असती, तर निधीअभावी बंद पडलेल्या १०० ते १२५ शाळांचे अस्तित्व वाचविता आले असते, अशी चिंता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांनी व्यक्त केली.

धुळे जिल्ह्यातील एका हायस्कूलच्या कार्यक्रमात बोलताना न्या. वराळे यांनी धार्मिक कार्यक्रम आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांवरील खर्चासोबत शिक्षणालाही प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत असताना शिक्षणाच्या अर्थसंकल्पातील तरतूद गेल्या अनेक वर्षांपासून १३ टक्क्यांच्या पातळीपर्यंतही पोहोचलेली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

मूलभूत सुविधांच्या अभावाचे गांभीर्य अधोरेखित करताना त्यांनी जमिनीवर झोपण्यास भाग पडलेल्या तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याच्या घटनेचा उल्लेख केला. पायाभूत सुविधांसोबतच प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांची चिंता



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## वर्दळीचे ठिकाण, प्रभाग १२ येथे डीपी बसवू नका : विकास चव्हाण



**नेवासा** : शहरातील प्रभाग क्रमांक बारा मधील वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या भागात विद्युत रोहित्र डीपी बसवू नका अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विकास चव्हाण यांनी वीज वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता राहुल बडवे यांना निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नेवासा शहरातील मध्यवस्तीत असणारा प्रभाग क्रमांक बारा हा नेहमी वर्दळीचे ठिकाण असलेला भाग म्हणून ओळखला जातो या भागात असलेल्या मुख्य चौकात जवळजवळ तीन ते चार रुग्णालये असून आजूबाजूला सर्व कुटुंबे रहात आहे. या ठिकाणी नागरिकांची नेहमी वर्दळ असते, लहान मुले व शाळकरी मुलांचा वावर या रस्त्यावर अधिक असतो. भविष्यात होणारा मोठा धोका लक्षात घेऊन सदर ठिकाणी महावितरणची विद्युत डीपी येथे बसवू नये अशी मागणी या भागातील नागरीकांची देखील असल्याने याचा विचार वीज वितरण कंपनीने करावा असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते विकास चव्हाण व अफरोज सय्यद उपस्थित होते.

## वाढदिवसाच्या दिवशीच दिव्याला नोकरीचे गिफ्ट



**श्रीरामपूर** : आशीर्वाद नगर येथील रहिवासी सतीश हातकर यांची कन्या कुमारी दिव्या हातकर हिने खइझड परीक्षेत उच्चतम श्रेणी प्राप्त करत बँक ऑफ महाराष्ट्रच्या श्रीरामपूर शाखेत कस्टमर सर्विस असोसिएट म्हणून नियुक्ती मिळवली. विशेष म्हणजे वाढदिवसाच्या दिवशीच तिच्या हातात नियुक्ती आदेश मिळाल्याने कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला. दिव्याचे प्राथमिक शिक्षण एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर, तर महाविद्यालयीन शिक्षण आर. बी. एन. बी. कॉलेज, श्रीरामपूर येथे झाले. तिने रसायनशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. इयत्ता दहावीनंतर तिने कोणतेही क्लास न लावता स्वअभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले.दिव्याचे आजोबा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर तिने आदर्श निर्माण केला आहे. तिच्या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

## वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी प्रदीप विटनोर, अमोल वाळुंज उपाध्यक्ष




**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या वतीने यंदाच्या नवरात्र उत्सवाच्या आयोजनासंदर्भात बैठक घेण्यात आली. या बैठकीत सन २०२६-२७ साठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यंदाच्या नवरात्र उत्सवाच्या अध्यक्षपदी प्रदीप विटनोर, तर उपाध्यक्षपदी अमोल वाळुंज यांची निवड करण्यात आली.तर कार्याध्यक्ष मयूर मोरे, व्यवस्थापक सुनील जाधव, सल्लागार अविनाश गायके, खजिनदार सुजित सिनारे, सह-खजिनदार सचिन कदम, संघटक मनोज तांबे, संपर्क प्रमुख मनोज गावडे, सचिव चारुदत्त दौंड, सह-सचिव सोमनाथ गुंजकर, प्रसिद्धी प्रमुख सूरज गागरे, सह-प्रसिद्धी प्रमुख वैभव कदम यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक तथा नगरसेवक वसंत कदम, जालिंदर दोंड, अमोल कदम, विजय मोरे, बाबासाहेब खांदे, विलास काळे, बाळासाहेब वाळुंज, प्रसाद कदम, महेंद्र दोंड, नितीन मोरे, राकेश बोरसे, मयूर घावटे, संजय धुमाळ, रोहित शिंदे, पियुष झंवर, प्रथमेश थोरात, ज्ञानेश्वर गागरे, सार्थक नेहे यांच्यासह प्रतिष्ठानचे सभासद उपस्थित होते.

## सैनिकांसाठी पारेगाव बुद्रुक शाळेने पाठवल्या दोनशे राख्या

**निमगाव पागा** : देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांमुळेच आपण सुरक्षित आहोत. आपण सण उत्सव सीमेवरील सैनिकांच्या मुळेच आनंदाने साजरे करतो. त्यांच्या प्रति प्रेम व संवेदना व्यक्त करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारेगाव बुद्रुक येथील विद्यार्थ्यांनी २०० राख्या स्वतःच्या सृर्जनशीलतेने बनवल्या. वनस्थळी संस्थेच्या कार्यकर्त्या पुष्पाताई नि-हाळी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच राखी बनवण्याची कार्यशाळा संपन्न झाली. खूप कमी खर्चात टाकाऊ साहित्याचा उपयोग करत मुलांनी विविध आकाराच्या सुंदर राख्या बनवल्या. या कार्यशाळेसाठी मुख्याध्यापक साहेबराव गायकवाड, सुखदेव इल्हे, नंदू कुडेकर, सुरेखा भालेराव, गणपत गोडे, प्रभाकर काळे, बाळासाहेब पाबळे आदी शिक्षकांनी सहभाग घेतला. मुलांनी बनवलेल्या राख्यांमधून दोनशे राख्या मेजर लक्ष्मण ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला परिसरात पाठवण्यात आल्या. यावेळी कार्यक्रमासाठी सुट्टीवर आलेले मेजर नवनाथ गडाख उपस्थित होते.

# मन:शांतीसाठी अध्यात्माची गरज

### डोळस श्रद्धेने अध्यात्म जपा : शालिनीताई विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लोणी** : मनःशांती, सामाजिक एकोपा आणि गावच्या विकासासाठी अध्यात्माची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. गावोगावी आयोजित होणारे सप्ताह, कथासोहळे आणि धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून अध्यात्माची परंपरा जपली जाते. मात्र, अंधश्रद्धेला खतपाणी न घालता भाविकांनी डोळस श्रद्धेला महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले. राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथे हनुमंतरायांच्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त भामाठाण येथील अडबंगनाथ देवस्थानचे मठाधिपती महंत अरुणगिरीजी महाराज यांच्या संगीतमय नवनाथ कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने भाविकांशी संवाद साधताना विखे पाटील बोलत होत्या. यावेळी विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या, आजच्या धकाधकीच्या जीवनात मनः शांतीसाठी अध्यात्माची नितांत गरज आहे.

गावोगावी होणारे सप्ताह व कथासोहळे हे अध्यात्म जपण्याबरोबरच माणसांची मने जोडण्याचे आणि सामाजिक एकोपा वाढविण्याचे प्रभावी माध्यम आहे. या अध्यात्मिक वाटचालीला विखे पाटील परिवाराने नेहमीच पाठबळ दिले आहे. वारकरी संप्रदाय आणि संतपरंपरा जपण्याचे कार्यही परिवाराच्या माध्यमातून सातत्याने होत आहे. महिलांनी विशेषतः डोळस श्रद्धेने अध्यात्माचा स्वीकार करावा आणि कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला बळी पडू नये, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी कथाकार महंत अरुणगिरी महाराज यांनी विखे पाटील परिवाराच्या माध्यमातून अध्यात्मिक क्षेत्राला मोठे योगदान दिले जात असल्याचे सांगितले. भामाठाणच्या विकासासाठीही विखे पाटील परिवाराने नेहमीच मदतीचा हात दिला आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघात जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून अध्यात्मिक चळवळीला चालना देण्याबरोबरच तीर्थक्षेत्र विकासाच्या माध्यमातून विविध विकासकामे मार्गी लावली जात असल्याचे त्यांनी सांगितले. दाढ बुद्रुक येथे सुरू असलेला नवनाथ कथा सोहळा हा आगळावेगळा आणि भव्य-दिव्य असल्याचे सांगत अरुणगिरी महाराज यांनी ग्रामस्थांच्या धार्मिक व सामाजिक सहभागाचे कौतुक केले. दरम्यान, या कथासोहळ्याची सांगता मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी महंत अरुणगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने होणार आहे. या सांगता सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दाढ बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## देसवंडी ग्रामपंचायत पॅटर्न पुन्हा चर्चेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : स्वातंत्र्य दिनानिमित्त होणारी देसवंडी ग्रामपंचायतीची ग्रामसभा यंदा २१ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडली. शिक्षण, शेतकरी, निराधार वयोवृद्ध, घरकुल, रेल्वे भूसंपादन तसेच गावातील विविध विकासकामांवर ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामस्थांच्या हितासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याने देसवंडी ग्रामपंचायतीचा पॅटर्न पुन्हा चर्चेत आला आहे. उपसरपंच सौ. वर्षा संदीप शिरसाठ यांच्या संकल्पनेतून व सौ. योगिताताई नितीन कल्हापूरे यांच्या प्रयत्नातून विविध योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'शिक्षण गौरव करमाफी योजने'अंतर्गत जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा निर्धार करण्यात आला.

शेतकऱ्यांसाठी 'अन्नदाता सन्मान योजना' राबविण्यात येणार असून, वयाची साठी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच अटल पेन्शन योजनेला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. निराधार वयोवृद्ध व ज्या कुटुंबात उत्पन्नाचा स्रोत नाही, अशा कुटुंबांसाठी 'आधारवड सन्मान योजना' राबवून त्यांची घरपट्टी व पाणीपट्टी पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'एक व्यक्ती-एक वृक्ष' योजनेचाही आढावा घेण्यात आला. गावातील अतिक्रमित जागा हटविण्याचा ठराव करण्यात आला. तसेच घरकुल, पाणी, आरोग्य व विकासकामांवर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी सौ. योगिताताई कल्हापूरे होत्या. सचिव म्हणून संतोष तिकडे यांनी काम पाहिले. ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली.

## प्राजक्ताचे यश ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी प्रेरणादायी : आ. लंघे




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट-ब परीक्षा २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून दुय्यम निबंधक श्रेणी-१, कर उपनिरीक्षक आणि सहायक कक्ष अधिकारी या तीन पदांसाठी निवड झालेल्या कु. प्राजक्ता संजय कचरे यांचा आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कुकाणा येथे झालेल्या या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येय निश्चित करून सातत्याने केलेली मेहनत, अभ्यासातील चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्राजक्ताने मिळविलेले यश ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी प्रेरणादायी आहे. तिच्या यशामुळे कुकाणा व नेवासा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, तिच्याकडून अनेक विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळेल, असे आ. लंघे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. देसाई देशमुख होते. महंत सुनिलगिरीजी महाराज, प्रा. जयश्रीताई गडाख, आशाताई मुरकुटे, भैय्यासाहेब देशमुख, अभियंता बाळासाहेब कचरे, कॉ. बाबासाहेब अरगडे, डॉ. नरवडे, काशिनाथ अण्णा नवले, दिनकरराव गर्जे, बाजीराव मुंगसे, मच्छिंद्र कावरे, सरपंच लता अभंग, अमोल अभंग आदी उपस्थित होते. महंत सुनिलगिरीजी महाराज यांनी प्राजक्ता ही संस्कारित व कर्तृत्ववान पिढीचे उदाहरण असल्याचे सांगत तिचे कौतुक केले. उपस्थितांनी प्राजक्ताचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक सौ. संजोग रवींद्र कचरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय चव्हाण यांनी केले.

### हे यश माझे नसून संपूर्ण कुटुंबाचे : प्राजक्ता कचरे

मला मिळालेले यश आई-वडिलांसह संपूर्ण कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे शक्य झाले. कठीण काळात कुटुंबाने खंबीर साथ दिली. चुलते व कुटुंबातील सदस्यांचे मार्गदर्शन सातत्याने लाभले. त्यामुळे हे यश केवळ माझे नसून संपूर्ण कुटुंबाचे आहे.

## शिरापूर येथील हनुमान मंदिर विकासासाठी १० लाखाचा निधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : गावच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून, विकास कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. गावातील हनुमान मंदिराच्या विकासासाठी आमदार निधीतून दहा लाख रुपयाचा निधी देणार असल्याची घोषणा आ. अमोल खताळ यांनी केली. संगमनेर तालुक्यातील शिरापूर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला आमदार अमोल खताळ यांनी भेट दिली. त्यावेळी भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी किशोर महाराज कोकाटे शरद पारासुर, संदीप वर्पे, आकाश पवार, अविनाश पांडे, छगन पांडे, विजय पारासुर, भीमराज पांडे, सुशील पारासुर, गणेश पारासुर उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले, महाराष्ट्राची आणि भारताची ओळख संत-महंत, अध्यात्म आणि हिंदू संस्कृतीच्या महान परंपरेमुळे जगभरात निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषांनी या भूमीला मोठी वैचारिक आणि सांस्कृतिक उंची दिली. आज देश-विदेशातून अनेक लोक महाराष्ट्रात येऊन येथील अध्यात्म, परंपरा आणि धार्मिक स्थळांचा अनुभव घेत आहेत. तर विकासकामे करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मानून आपण काम करत आहोत. आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांमुळे अन लोकांची कामे करण्याची संधी जनतेने दिल्यामुळे हे कर्तव्य पार पाडत असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी स्पष्ट केले.

## मफुकृ विद्यापीठातील उद्यानविद्या विभागाच्या रोपवाटीकेला दुसऱ्यांदा थ्री स्टार मानांकन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या रोपवाटीकेला भारत सरकारच्या राष्ट्रीय बागवानी बोर्डाद्वारे दुसऱ्यांदा सर्वोच्च थ्री स्टार (सर्वोत्तम) दर्जा प्राप्त झाला आहे. ही रोपवाटीका विद्यापीठाच्या स्थापनेपासुनच दर्जेदार, जातीवंत, किडरोगमुक्त कलमे/रोपे निर्मितीसाठी ओळखली जाते. उद्यानविद्या विभागाच्या या रोपवाटीकेत दरवर्षी डाळिंब, आंबा, कागदी लिंबु, चिकू, सिताफळ, जांभुळ, पेरु इ. फळझाडांची विविध वाणांची निरोगी/दर्जेदार १० लाखांच्या वर रोपांची निर्मिती करुन ती शेतकऱ्यांना वितरीत केली जातात. या रोपवाटीकेत तयार झालेल्या कलमे/रोपांना शेतकऱ्यांकडून प्रथम पसंती असते. म्हणुनच जातीवंत कलमे/रोपे पुरवठा करण्यामध्ये उद्यानविद्या रोपवाटीकेचा मोलाचा सहभाग राहिलेला आहे.

जुलै-२०२६ मध्ये गुरुग्राम (हरियाणा) येथील राष्ट्रीय बागवानी बोर्ड यांच्या चमुने मानांकनासाठी रोपवाटीकेची तपासणी केली. यावेळी या रोपवाटीकेत निर्माण केले जाणारे विविध फळझाडांच्या कलमे रोपांच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच रोपवाटीकेच्या मानांकनासाठी शिफारस केली. त्यानुसार भारत सरकारच्या राष्ट्रीय बागवानी बोर्डाकडून या रोपवाटीकेला सर्वोच्च थ्री स्टार दर्जा प्राप्त झाल्याचे प्रत्राद्वारे कळविण्यात आले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांचे रोपवाटीकेला मानांकन मिळण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. रोपवाटीकेला मानांकन मिळण्यासाठी उद्यानविद्या प्रक्षेत्राचे अधिकारी डॉ. सचिन मगर तसेच रोपवाटीकेचे प्रभारी विजय पवार, राहुल पाटील व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## फिरोदिया-शिवाजीयन्स फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचे यश

### १४ वर्ष वयोगटांत मुलांचा संघ विजयी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लोणी / प्रवरानगर** : नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांच्या आयोजनाखाली झालेल्या आंतरशालेय फिरोदिया- शिवाजीयन्स फुटबॉल स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूल चा १४ वर्ष वयोगटाचा संघ विजेता ठरला या स्पर्धेत ५४ शाळा सहभागी झाल्या होत्या. विजय संघामध्ये कर्णधार मोहित चौधरी आणि उपकर्णधार जयवर्धन देशमुख-माने यांनी चांगली खेळी कळत हा विजय संघाला प्राप्त करून दिला अशी माहिती प्राचार्य डॉ. बी.बी. अंबाडे यांनी दिली. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या संघाचे कर्णधारपद मोहित चौधरी यांनी, तर उपकर्णधारपद जयवर्धन माने देशमुख यांनी सांभाळले. संघांनी शिस्तबद्ध खेळ करत संघभावनेचे उत्कृष्ट उदाहरण घडवले. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रिन्स चंदन,रुद्र भोई, रामचंद्र पालवी यांना संपूर्ण स्पर्धेतील'उत्कृष्ट खेळाडू पुरस्काराने गौरविण्यात आले. विजयी खेळाडूंना प्रवरा संस्थेच्या कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते पदके व ट्रॉफी प्रदान करण्यात आली.या स्पर्धेसाठी क्रिडाशिक्षक अबजल पटेल, जाधव तसेच फुटबॉल प्रशिक्षक अतुल डे यांचे मार्गदर्शन लाभले.

निशाणी-७
नेमलेली ता.१७.०९.२०२६
ॲड.आर.यू.पागिर

**जाहीर नोटीस**

३रे नेवासा येथील में दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ३४/२०२६

**अर्जदार**
१.संभाजी साहेबराव धनक, वय ४४ वर्षे, धंदा शेती,
रा. नारायणवाडी, ता. नेवासा जि. अहिल्यानगर
२. राणी नामदेव वाणी, वय ३७ वर्षे, धंदा शेती,
रा. ब्राम्हणगांव वेताळ, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर

**सामनेवाला - कोणी नाही.**
रंगनाथ नाथु धनक (मयत दि. २९.०६.१९९२) (मयत ठिकाण- नारायणवाडी)
साहेबराव रंगनाथ धनक (मयत दि. १६.१०.२०२१) (मयत ठिकाण- नारायणवाडी)
सिंधुबाई साहेबराव धनक (मयत दि. २४.०२.२०२४) (मयत ठिकाण - नारायणवाडी)
शिवाजी साहेबराव धनक (मयत दि. २१.१२.२०२२) (मयत ठिकाण- उस्थळ दुमाला)

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. ३४/२०२६ दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ व २ हे एकमेकांचे बहिण भाऊ आहे. मयत रंगनाथ नाथु धनक हे अर्जदार यांचे आजोबा आहे. तसेच मयत साहेबराव रंगनाथ धनक व सिंधुबाई साहेबराव धनक यांचे अर्जदार हे आई वडिल आहे. तसेच मयत शिवाजी साहेबराव धनक हे व अर्जदार हे सख्खे भाऊ बहिण आहे. असा अर्जदार व मयताचा नाते संबंध आहे. मयत रंगनाथ नाथु धनक यांना मयत साहेबराव रंगनाथ धनक हे एकमेव वारस होते. रंगनाथ हे दि.२९.०६.१९९२ रोजी मौजे नारायणवाडी, ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. तसेच साहेबराव रंगनाथ धनक व सिंधुबाई साहेबराव धनक यांना अर्जदार नं. १ व २ तसेच मयत शिवाजी साहेबराव धनक हेच एकमेव वारसदार होते व आहे. त्यांच्या व्यक्तीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत साहेबराव रंगनाथ धनक हे नारायणवाडी, ता. नेवासा तसेच सिंधुबाई साहेबराव धनक हे नारायणवाडी तसेच शिवाजी साहेबराव धनक हे मौजे उस्थळ दुमाला, ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. मयतांचे संपूर्ण विधी हे अर्जदार यांनीच केलेले आहे. त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत रंगनाथ नाथु धनक व साहेबराव रंगनाथ धनक व सिधुबाई साहेबराव धनक यांचे नावावर ग्रामपंचायत मिळकत नंबर ६३/१ व ६४ या मिळकतीस नावे आहे. सदर जमिनीस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. १७.०९.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयताचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि. २४.०८.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.
पुढील नेमलेली तारीख - १७.०९.२०२६

**आदेशावरुन** **कनिष्ठ लिपीक** **सह दिवाणी न्यायालय, क स्तर, नेवासा**
शिक्का
**आदेशावरुन** **सहा अधिक्षक** **सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, नेवासा**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि ।। अहिल्यानगर सब डि ।। ता. कर्जत पैकी मौजे थेरगांव हद्दीतील नामे १) सौ. विजया राधाकिसन पाचारणे व २) सौ. स्मिता अनिल शेलार यांचे मालकीची शेत जमीन मिळकत नं. १ यांचे मालकीची गट नं. ५३६/२ पैकी क्षेत्र ०.४०.४० हे.आर., स्वे. मीटर, पो.ख. ०.४३.०० हे.आर., स्वे. मीटर, एकुण ०.८३.४० हे.आर., स्वे. मीटर, आकार ० रु. २२ पैसे व नं. २ यांचे मालकीची गट नं. ५३६/२ पैकी क्षेत्र ०.३०.५६ हे.आर., स्वे. मीटर, पो.ख. ०.४२.०० हे.आर., स्वे. मीटर, एकुण ०.७२.५६ हे.आर., स्वे. मीटर, आकार ० रु. १६ पैसे यांसी चतुःसिमा सरकारी रेकॉर्ड प्रमाणे ही मिळकत १) सौ. विजया राधाकिसन पाचारणे व २) सौ. स्मिता अनिल शेलार दोघी रा. थेरगांव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे वडीलोपार्जीत मालकी हक्क प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. सदर वरील जमीन मालकांनी त्यांचे हिश्याचे संपूर्ण क्षेत्र त्यांचे एकत्र हिंदु कुटुंबाचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास कायम खुश खरेदी देणेचे मान्य व कबुल करुन त्याप्रमाणे सौदाबोलणी होऊन वरील जमीन मालकांनी आमचे अशिलाकडून विसारापोटी रक्कमही स्विकारलेली आहे. तसेच वरील जमीन मालकांनी सदर मिळकतीवरील त्यांचा मालकी हक्क कब्जा निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व निर्वाळा आमचे अशिलास दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीवर त्यांचेशिवाय इतर कोणाचाही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिज, लिन बक्षीसपत्र, इच्छापत्र, पोटगी, भाडेपट्टा, वारसहक्क इ. कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बोजे असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाचे आत आम्हास खालील पत्त्यावर व सेलफोनवर आपली लेखी अगर तोंडी हरकत कळवावी व आपला हक्क कागदोपत्री शाबीत करुन द्यावा व आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखजी, बोजाविरहीत आहे असे गृहीत धरुन अथवा ज्याचा कोणाचा कसल्याही प्रकारचा तथाकथीत हक्क हितसंबंध इ. असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. तसेच तशी हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही नोटीस दिली असे.

स्थळ : कर्जत
दिनांक : २३/०८/२०२६

**सही**
**आर.बी.दहिवळकर**
**ॲडव्होकेट**
**नोटरी पब्लीक (भारत सरकार)**
**कोर्ट गल्ली, कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर**

## महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेचा राज्यस्तरीय महामेळावा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महामेळावा शिर्डी येथे उत्साहात आणि मोठ्या उपस्थितीत पार पडला. राज्यातील विविध जिल्ह्यांतून महसूल सेवक, जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महामेळाव्यात महसूल सेवकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आगामी काळात करावयाच्या कार्यवाहीबाबत उपस्थितांच्या सर्वानुमते महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. संघटनेच्या पुढील आंदोलनात्मक व संघटनात्मक कार्यवाहीसाठी सर्वांनी एकजुटीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेचे अध्यक्ष नामदेवराव शिंदे, विदर्भ महसूल सेवक संघटनेचे अध्यक्ष रवींद्र बोदिले, संस्थापक समन्वयक प्रविण कर्डक, राज्य कार्याध्यक्ष कृष्णा शिंदे, राज्य सरचिटणीस संतोष खोले, नाशिकचे जितू रिपोटे, अहिल्यानगरचे राज्य उपाध्यक्ष सोमनाथ गाडेकर यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. महसूल सेवकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. महामेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपस्थित राहिलेल्या सर्व महसूल सेवकांचे सोमनाथ गाडेकर यांनी आभार मानले. 'एकजूट, संघर्ष, हक्क आणि न्याय' या घोषणेने महामेळाव्याचा समारोप झाला.

**जाहीर नोटीस**

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/१३५/२०२६
कोपरगांव दि. ०८/०८/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
नाजीराबी युसुफ सय्यद रा. कोपगरंव ता.
कोपरगांव जि, अहिल्यानगर विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा
नगरपरिषद कोपरगांव,
ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार नाजीराबी युसुफ सय्यद रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि अहिल्यानगर जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे नाजीरावी युसुफ सय्यद यांची आई या दिनांक. ०१/०६/१९७० रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी त्यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनांक ०१/०६/१९७० रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. ०८/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

**जाहीर नोटीस**

तहसिल कार्यालय कोपरगांव
क.कावि/फौजदारी/१३७/२०२६
कोपरगांव दि. ०८/०८/२०२६

कोपरगांव येथील में, तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
सांडु मुलाम शेख, रा. सुराळ ता. वैजापुर, जि. संभाजीनगर
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी
तथा ग्रामपंचात करंजी बु.,
ता. कोपरगांव, जि.अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार सांडु मुलाम शेख रा. सुराळा ता. वैजापुर जि संभाजीनगर जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे सांडु मुलाम शेख यांची पत्नी या दिनांक. २९/१०/२००१ रोजी मौजे करंजी बु. ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार यांचे पाल्य नामे रमजान सांडु शेख याचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे पाल्याचे जन्माची नोंद ग्रामपंचायत करंजी बु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे पाल्याचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे, कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी त्यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे पाल्याचा जन्म दिनांक २९/१०/२००१ रोजी मौजे करंजी बु. ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे पाल्याचे जन्माची नोंद ग्रामपंचायत करंजी बु. ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही, याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. ०८/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

## द•ख•ल

### टाकळी कडे सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदी संगीता वाळुंज यांची बिनविरोध निवड

**श्रीगोंदा :** टाकळीकडे येथील सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदाची निवडणूक निवडणूक अधिकारी भोसले मॅडम यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी सौ. संगीता विक्रम वाळुंज यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आठ संचालक उपस्थित होते. सोसायटीचे चेअरमन अशोक नवले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवड प्रक्रियेत संचालक अशोक सोनवणे, विठ्ठल वाळुंज, नितीन माणिक वाळुंज, महेश भिसे, कांचन अरुण नवले, सुकृत संचालक रावसाहेब नवले व महिपती रामराव खेडकर आदी उपस्थित होते. संगीता वाळुंज यांची व्हा. चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर उपस्थित संचालक, ग्रामस्थ व सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले. सोसायटीच्या माध्यमातून सभासद व शेतकऱ्यांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी मार्गदर्शक एडवोकेट अशोकराव वाळुंज, दिलीप आबा वाळुंज, होरे माऊली शिवहरी वाळुंज, दत्तात्रय तात्याराम नवले, राजेंद्र खामकर, संदीप इथापे, सुनील वाळुंज, देविदास वाळुंज, सचिव दिवटे साहेब, धर्मनाथ वाळुंज, पूनमचंद वाळुंज, राजेंद्र ज्ञानोबा वाळुंज, दत्तात्रेय खामकर, बापूराव इथापे यांच्यासह ग्रामस्थ व सभासद उपस्थित होते.



### पोस्टमास्तर ऋषिकेश फड यांचा पिंपळगाव रोठा ग्रामस्थांकडून सन्मान

**पारनेर :** तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील पोस्टमास्तर ऋषिकेश फड यांनी सन २०२३ ला भारतीय डाक विभागात पिंपळगाव रोठा येथे सेवेला रुजू होऊन प्रथमच सेवा प्रारंभ केला होता. सेवा आरंभ झाल्यापासून तीन वर्षाच्या कार्यकाळात पोस्टमास्तर ऋषिकेश सोपान फड यांनी सदर तीन गावांचा जनतेसी सतत संपर्क साधून पोस्ट विभागातर्फे असलेल्या शासनाच्या योजनांची, सवलतींची, आर्थिक सुरक्षिततेची माहिती शेतकरी, शेतमजूर, ग्रामस्थांना समजावून जनतेमध्ये त्या योजना बद्दल गाव पातळीवर जागृती निर्माण केली. चार महिन्यात सार्वधिक प्रीमियम जमा करून पुणे विभागामध्ये पिंपळगाव रोठा पोस्ट मास्तर चा तिसरा क्रमांक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला याबद्दल पिंपळगाव रोठा ग्रामस्थांच्या वतीने ग्रामस्थ,शेतकरी,विद्यार्थी, पालक,मुंबईकर मंडळी यांच्या उपस्थितीत १५ऑगस्ट ८० व्या स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात ॲड. पांडुरंग गायकवाड यांच्या हस्ते ऋषिकेश फड यांचा गौरव सन्मान करण्यात आला.



### भाजप महिला मोर्चाची अहिल्यानगर दक्षिण कार्यकारिणी जाहीर

**राशीन :** भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, राशीन येथील भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष ॲड. प्रतिभा सचिन रेणुकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील महिला संघटनेला नवे बळ मिळाले आहे. महिला संघटन मजबूत करण्यासह पक्षाच्या ध्येयधोरणांचा प्रभावीपणे प्रचार-प्रसार करण्याची जबाबदारी या नव्या कार्यकारिणीवर सोपविण्यात आली आहे. जिल्हा उपाध्यक्षपदी शुभांगी जगताप, अंजना बांडे, शीला खराडे, आशा दारकुंडे यांची निवड करण्यात आली आहे. तर जिल्हा सरचिटणीसपदी गया माने, दीपाली गर्जे , जान्हवी शेवाळे, सुनीता शिंदे, कुसुम ससे यांना संधी देण्यात आली आहे. जिल्हा चिटणीसपदी मीरा बांगर, सुनीता खेडकर, सुनीता पारखे, सुरेखा गिते, चंद्रकला खेडकर यांची निवड झाली आहे. राशीनच्या ॲड. प्रतिभा रेणुकर यांच्या नेतृत्वाखाली महिला मोर्चाची ही मोठी टीम आगामी काळात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी, महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावणार आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून जिल्ह्यात महिला शक्तीचे संघटन अधिक प्रभावी करण्याचे आव्हान ॲड. रेणुकर यांच्यासमोर असून, त्यांच्या नेतृत्वाकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### युवा शास्त्रज्ञ डॉ.रणजित राऊत यांना पीएच.डी.

**माहिजळगाव :** जामखेड तालुक्यातील फक्राबाद चे युवा शास्त्रज्ञ, जैवविविधता संशोधक व योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्राणिशास्त्र विभागाचे संशोधक डॉ.रणजित रावसाहेब राऊत यांनी बायोडायव्हर्सिटी ऍसेसमेंट ऑफ इकॉनॉमिकली इंपॉरटंट बायव्हाल्व मॉलुस्क्स् ऍंड इन्व्हेस्टिगेशन ऑफ शेलफिश पॉईजनिंग बाय मायक्रो-ऑरगॅनिजम्स फ्रॉम भाट्ये इस्चूरी रत्नागिरी कोस्ट ऑफ महाराष्ट्र या विषयावरील संशोधन प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे सादर केला. याबद्दल त्यांना विज्ञान व तंत्रज्ञान शाखेकडून प्राणिशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. या यशाबद्दल डॉ.रणजित रावसाहेब राऊत यांनी आपल्या संशोधन मार्गदर्शकांसह बाह्य परीक्षक,प्राचार्य, प्राध्यापक,वैज्ञानिक, संशोधक सहकारी, कुटुंबीय,मित्रपरिवार आणि संशोधन प्रवासात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत. डॉ.रणजित राऊत हे युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक म्हणून कार्यरत असून प्राणिशास्त्र, जैवविविधता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण भागातील जनजागृतीच्या क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांच्या पीएच.डी. संशोधनाच्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्रा. डॉ.एम.व्हि.कानेटकर, प्राणिशास्त्र विभाग व महाविद्यालयातील सर्व उपप्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापकवृंद, संशोधक विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### गणेशोत्सवापूर्वी प्लास्टिकच्या फुलांच्या विक्री-वापरावर निर्बंध घाला

**अहिल्यानगर :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात प्लास्टिक व कृत्रिम फुलांची विक्री, वापर आणि वितरण यावर लागू कायदे व शासनाच्या निर्देशांनुसार आवश्यक ती बंदी अथवा निर्बंधात्मक कार्यवाही करावी. तसेच नैसर्गिक फुलांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना व जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा उत्सव असला तरी तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे हीदेखील सामूहिक जबाबदारी आहे.

# कोणत्याही परिस्थितीत बळीराजाची अडचण होता कामा नये

## आ. अक्षय कर्डिले यांची महावितरणला स्पष्ट सूचना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका : पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटाच्या छायेत असताना वांबोरी चारीला पाणी सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र चारीचे पाणी शेतापर्यंत नेण्यासाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. विजेअभावी सिंचन करता येत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आ. अक्षय कर्डिले यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांची अडचण होता कामा नये. शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत.**



राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप पिके पावसाच्या प्रतीक्षेत असताना शेतकऱ्यांना वांबोरी चारीच्या पाण्याचा आधार मिळाला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर वांबोरी चारीला पाणी सोडण्याचा निर्णय झाला. वीजपुरवठ्याची समस्या निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होत आहे.

याबाबत आ. अक्षय कर्डिले यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत बळीराजाची अडचण होता कामा नये. वीजपुरवठा तातडीने सुरळीत करून पूर्ण दाबाने वीज द्यावी अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पावसाअभावी खरीप पिकांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत आहे. सोयाबीन, बाजरी, मका तसेच इतर खरीप पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे. अशा परिस्थितीत वांबोरी चारीचे पाणी मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झालेल्या आहेत.

> अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारा आणि त्यांची व्यथा जाणून घेणारा लोकप्रतिनिधी म्हणून आमदार कर्डिले यांची भूमिका दिलासादायक आहे. आमदार कर्डिले यांच्या भूमिकेमुळे वांबोरी चारी लाभधारक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.
>
> **जयसिंग आव्हाड**

बळीराजा आधीच निसर्गाच्या संकटात सापडला आहे. त्यात वीजपुरवठ्याची अडचण निर्माण होणे योग्य नाही. अशी भूमिका आमदार कर्डिले यांनी घेत महावितरणला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शेतकरी केवळ अन्नदाता नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. त्यामुळे पिकांना वेळेत पाणी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाऊस लांबला असताना उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब शेतकऱ्यांसाठी मोलाचा आहे. त्यामुळे वांबोरी चारीचे पाणी आणि सुरळीत वीजपुरवठा या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आ. कर्डिले यांनी शेतकऱ्यांच्या अडचणीची तातडीने दखल घेत महावितरणला दिलेल्या सूचनांचे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे.

# श्रीगोंदा पोलिसांच्या कारवाईत परप्रांतीय आरोपी जेरबंद

## चार दिवसांच्या पोलीस कोठडीत गुन्ह्याची कबुली

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** शहरात मोटारसायकलला लावलेल्या पिशवीतून २ लाख १४ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याच्या गुन्ह्याचा श्रीगोंदा पोलिसांनी छडा लावला आहे. मध्यप्रदेशातील कडिया सांसी येथील संशयित आरोपी अनुराग मटरूलाल सिसोदिया (वय ३५) याला पोलिसांनी जेरबंद केले असून, त्याच्याकडून चोरीची संपूर्ण २ लाख १४ हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. आरोपीच्या पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या चौकशीत आणखी 'बॅग लिफ्टिंग'चे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



दि. १५ जून २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास आदळगाव येथील झुंबर दत्तू नवले यांच्या मोटारसायकलला लावलेल्या पिशवीतून अज्ञात चोरट्याने २ लाख १४ हजार रुपयांची रोकड चोरून नेली होती. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना गुप्त बातमीदारामार्फत आरोपीबाबत महत्त्वाची माहिती मिळाली. हा गुन्हा मध्यप्रदेशातील राजगढ जिल्ह्यातील पचोर तालुक्यातील कडिया सांसी येथील अनुराग सिसोदिया याने केल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

चोरीची रोकड कुठे ठेवली आहे, याबाबत चौकशी केली असता आरोपीने २ लाख १४ हजार रुपयांची रक्कम मध्यप्रदेशातील कडिया सांसी येथील आपल्या पत्नीकडे दिल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्यानंतर श्रीगोंदा पोलिसांचे विशेष पथक कडिया सांसी येथे गेले. तेथून चोरीची संपूर्ण २ लाख १४ हजार रुपयांची रोकड जप्त करून त्याचा पंचनामा करण्यात आला.

दरम्यान, आरोपीला आज दि. २४ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला आणखी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यामुळे या कालावधीत आरोपीकडून आणखी काही गुन्ह्यांची माहिती समोर येते का, याकडे पोलिसांचे लक्ष आहे. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ, पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, पोलीस उपनिरीक्षक पुष्कर कडू, सफौ दत्तात्रय शिरसाठ, पोहेकॉ संभाजी शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल देविदास पळसे, संदिप राऊत, अरुण पवार, सचिन वारे, अविनाश कराळे, अमोल मरकड, राहुल मोढळे, विवेक दळवी, पोहेकॉ साबळे, पोलीस कॉन्स्टेबल नय्युम पठाण तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंडू व अरुण सांगळे यांनी सहभाग घेतला. न्यायालयीन कामकाजात सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता जी.बी. सुरशे व जी.बी. नेवसे यांनी बाजू मांडली.

### निघोज ते कुंड रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्या



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** निघोज ते जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड हा चार किलोमीटर रस्ता अत्यंत खराब झाला असून आमदार काशिनाथ दाते सर यांनी यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची मागणी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकर कवाद, ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके,माजी पदाधिकारी ॲड. बाळासाहेब लामखडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आ. दाते यांच्याकडे सोमवार रोजी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी अंबिका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, बाजार समीतीचे माजी उपसभापती भाऊसाहेब लामखडे, सोसायटीचे माजी उपाध्यक्ष वसंत ढवण, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, युवा नेते रमेश वरखडे, सोमनाथ वरखडे आदी उपस्थित होते. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यावेळी म्हणाले गेली आठ वर्षांपूर्वी या चार किलोमीटर रस्त्याचे काम झाले होते मात्र जड वाहतूक व पाऊस यामुळे हा रस्ता पुर्णपणे उखडला गेला आहे जागोजागी खड्डे पडले आहेत. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे मंदिर याठिकाणी आहे.

# कितीही बाह्यशक्ती येऊ द्या, पुरून उरणार : खा. लंके

## तुमचा शेवट केल्याशिवाय शांत बसणार नाही

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** तुमच्याकडे कितीही शिक्षण संस्था, कारखाने आणि लोकं असली तरी तुम्ही कितीही अंत पाहण्याचा प्रयत्न करा, नीलेश लंके तुम्हाला पुरून उरणार आहे. राजकारणात तुमचा शेवट केल्याशिवाय शांत बसणार नाही, असे खंडेरायाच्या चरणी सांगतो. बाह्यशक्ती असो अथवा आंतरशक्ती, कोणतीही शक्ती आली तरी मी सामोरे जाण्यास तयार आहे. आगामी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत लंके जिल्हा बँकेत जाणारच, असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला. पिंपळगाव रोठा येथील श्री कोरठण खंडोबा देवस्थान परिसरात विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण खासदार लंके यांच्याहस्ते झाले. या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर होते. लंके यांनी विकासकामांच्या माध्यमातून




जनतेशी जोडलेले राजकारण आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करत विरोधकांवर नाव न घेता जोरदार शरसंधान साधले. लंकेचे तालुक्यात लक्ष नाही, असे बऱ्याच जणांना वाटते. मात्र, जिल्हा बँकेच्या ठरावाच्या वेळी आपण काय करू शकतो, हे दाखवून दिले आहे. आता जिल्हा बँकेच्या निवडणुका जाहीर होत आहेत. कार्यक्रमास दीपक लंके, सीताराम काकडे, गंगाराम बेलकर, अशोक घुले, मोहन रोकडे, किसन रासकर, किरण ठुबे, चंद्रभान ठुबे, अर्चना गायकवाड, प्रियांका शेळके, रामेश्वर निमसे, अथर खान, मतीन शेख यांच्यासह विविध पदाधिकारी, सरपंच, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.सरपंच प्रकाश गाजरे, सरपंच हनुमंत उर्फ गुंडा भोसले, रवींद्र गायखे, ड. संतोष वाळुंज, उद्योजक श्रीरंग रोकडे, अमोल उगले, सरपंच अभिजीत झावरे, सरपंच सावकार शिंदे, बाळा पुंडे, दिनेश चौगुले, सरपंच महेंद्र गायकवाड, बापू चत्तर, कांतीलाल साळवे, अजित साळवे, सुभाष ढोकळे गुरुजी, भाऊसाहेब घाडगे, बापू ठुबे यांच्यासह पिंपळगाव रोठा ग्रामस्थ, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश पाडेकर यांनी केले.

# दरेवाडीतील महार वतन जमिनींच्या व्यवहारांची चौकशी करा!

## शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मौजे दरेवाडी येथील सर्वे क्रमांक ४५, ४६/२, ४७/२, ४८ व ५० या महार वतन अथवा महार इनाम वर्ग-६ जमिनींची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून बेकायदेशीर ठरलेले खरेदी व्यवहार व फेरफार नोंदी रद्द कराव्यात, तसेच कायद्यानुसार पात्र मूळ महार वतनदारांना त्यांच्या जमिनी परत मिळवून द्याव्यात, अशी मागणी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.



यावेळी शिवसेना सामाजिक न्याय विभाग दक्षिणचे जिल्हाप्रमुख विनोद साळवे, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार संघाचे अहिल्यानगर उपाध्यक्ष दीपक कांबळे, रमेश धोंडीराम भिंगारदिवे, विनायक उबाळे, लता पगारे, लंका भिंगारदिवे, द्वारका पंडित, सुनील भोसले, आदिती शिंदे, विनोद भिंगारदिवे आणि तृप्ती ढगे आदी उपस्थित होते. निवेदनानुसार, दरेवाडी येथील सर्वे क्रमांक ४५, ४६/२, ४७/२, ४८ व ५० या जमिनी इंग्रजकालीन महार वतन अथवा महार इनाम वर्ग-६ स्वरूपाच्या असून, तत्कालीन महार वतनदारांना त्यांच्या पारंपरिक सेवेसाठी या जमिनी प्रदान करण्यात आल्या होत्या. यापैकी काही जमीन संरक्षण विभागाने संपादित केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र उर्वरित जमिनींच्या मालकी हक्क व व्यवहारांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या जमिनींबाबत विविध काळात झालेले खरेदी व्यवहार, फेरफार नोंदी आणि मालकीतील बदल संबंधित कायदे व महसूल प्रक्रियेनुसार झाले आहेत की नाहीत, याची तपासणी करणे आवश्यक असल्याचे म्हंटले आहे. विशेषतः महार वतन उन्मूलन कायदा, १९५८ मधील कलम ५ आणि त्याअंतर्गत आवश्यक पुनर्मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाली होती का, याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित जमिनींच्या बाबतीत नोटीस, दवंडी, कायदेशीर प्रक्रिया, भरपाई, फेरफार मंजुरी आणि महसूल अभिलेखांची योग्य पडताळणी झाली आहे का, याचीही तपासणी करावी, असे निवेदनात नमूद आहे.

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव वर्षानुवर्षे धुळखात; आंदोलनाचा इशारा

## 'समान काम, समान वेतन' मागणीसाठी कर्मचारी संपाच्या पवित्र्यात : सांगळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावावर शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. समान कामासाठी समान वेतनाच्या मागणीसाठी महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आता आंदोलनाची भूमिका घेतली असून, मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेची बैठक संपन्न झाली. महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी गट-क संघटना, लघुलेखक, बेलीफ महासंघ तसेच चतुर्थ श्रेणी महासंघ यांची एकत्रित बैठक महासंघाचे अध्यक्ष दादा निकम यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पार पडली होती. या बैठकीत आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली. त्यानंतर अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेची विशेष बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.

बैठकीस अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, उपाध्यक्ष रवींद्र सूर्यपुजारी, आर. एन. गुंडू, आस्लम सय्यद, अजिनाथ पाडळकर, अतुल खरपुडे, बंडू बडे, सविता भालेराव, आर. डी. बेल्हेकर, डी. एस. परदेशी, अनिल निमसे, म्हाळसाकांत लिपाने, एस. एस. भालेराव, एस. एल. क्षिरसागर, वंदना केदार, अर्चना झिंजे, एस. एस. वाघ, व्ही. एच. खरात, सागर गायकवाड, प्रशांत खराडे, सुजित सानप, शिवाजी चांडोळे, अशोक जंगले, श्याम काठे, अमर तिवारी, ए. बी. मरकड, सुनील भाबड आदींसह न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष अंकुश सांगळे म्हणाले की, न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दुय्यम न्यायालयीन कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत. मात्र, त्यांच्या वेतनातील असमानतेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.



उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, याबाबतचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून शासनाकडे पाठविला आहे. मात्र हा प्रस्ताव अद्याप मंत्रालयात प्रलंबित आहे. शासनाने हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सांगळे यांनी केली.

मागणी मान्य न झाल्यास १६ सप्टेंबर तसेच १६ व १७ ऑक्टोबर रोजी न्यायालयीन कर्मचारी काळ्या फिती लावून काम करतील. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी एक दिवस सामूहिक रजा घेण्यात येईल. तरीही शासनाने मागण्या मान्य न केल्यास १७ नोव्हेंबरपासून सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जातील, असा इशारा अंकुश सांगळे यांनी दिला.

मात्र, त्याच कामाच्या तुलनेत वेतनामध्ये निर्माण झालेली असमानता कर्मचाऱ्यांच्या मनातील असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे आता केवळ निवेदने आणि विनंत्यांपुरते मर्यादित न राहता संघटित आंदोलनाची तीव्रता वाढविण्यापूर्वी शासनाने संघटनेशी तातडीने चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी केली.

न्यायव्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी अहोरात्र योगदान देणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. 'समान काम, समान वेतन' हा आमचा न्याय्य हक्क असून, तो मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आली.

## दखल



### सलग तिसऱ्या वर्षी बीजेएस वाघोली विद्यालयाला 'स्वच्छ शाळा' पुरस्कार

**वाघोली :** गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव आयोजित आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड प्रायोजित 'गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२५-२६'मध्ये भारतीय जैन संघटनेच्या वाघोली विद्यालयाला सलग तिसऱ्या वर्षी 'स्वच्छ शाळा' पुरस्कार मिळाला. जैन हिल्स, जळगाव येथे झालेल्या पुरस्कार वितरण सम रंभात जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडचे अध्यक्ष तथा गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त अशोक जैन आणि जळगाव महानगरपालिकेचे आयुक्त आदित्य जीवने यांच्या हस्ते विद्यालयाने हा पुरस्कार स्वीकारला.यावेळी अप्पा पटवर्धन सफाई व तंत्रनिकेतन, देहूच्या संचालिका डॉ. शिल्पा नारायणन आणि गांधी तीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगितेचे मुख्य समन्वयक गिरीश कुळकर्णी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांतील ९० तालुक्यांमधून सुमारे एक हजार शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ४५ शाळांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. बीजेएस वाघोली विद्यालयाने स्वच्छतेला विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचा संस्कार बनविण्यासोबतच स्वावलंबन, शिस्त, टीमवर्क, नियोजन, जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धन यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविले.विद्यालयाचे प्राचार्य संतोष भंडारी, उपप्राचार्य पोपटराव गेठे, पर्यवेक्षक पांडुरंग पवार, प्रशांत पितालिया आणि शिक्षकांनी पुरस्कार स्वीकारला. प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंके, शाळा समिती अध्यक्ष अरुण नाहर, बीजेएस प्रबंध समितीचे अध्यक्ष विलास राठोड आणि बीजेएस संस्थापक शांतीलाल मुथ्था यांनी विद्यालयाचे अभिनंदन केले.अभियानाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक संदीप लोणकर, विष्णू देवडकर, विजय अंधारे, स्मिता शिंदे, सूर्यकांत शिंदे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

### नवीन 'आपले सरकार सेवा केंद्र'साठी अर्ज प्रक्रिया सुरू

**पुणे :** पुणे जिल्ह्यात नवीन 'आपले सरकार सेवा केंद्र' वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी ग्रामपंचायतीनिहाय रिक्त जागांची यादी, अर्ज मागविण्याच्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना पुणे जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयानुसार सेवा केंद्रांची संख्या कमी असलेल्या ग्रामपंचायती व नागरी क्षेत्रांची माहिती संकेतस्थळासह स्थानिक वर्तमानपत्रे आणि संबंधित कार्यालयांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ९ जुलै २०२६च्या शासन शुद्धिपत्रकानुसार गुणांकनावर आधारित निवड निकष, किमान पात्रता, पायाभूत सुविधा, मुलाखत, कार्यप्रदर्शनावर आधारित करार नूतनीकरण आणि अपात्रता निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा ३० ऑगस्टला सत्कार

**पुणे :** अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे (पब्लिक ट्रस्ट) यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा रविवारी (ता. ३०) आयोजित करण्यात आला आहे. शिवाजीनगर येथील द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) येथे सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.इयत्ता दहावी, बारावी, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा या वेळी गौरव करण्यात येणार आहे. तसेच एमपीएससी, यूपीएससी, सीए, पीएचडी आदी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचाही संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष साहेबराव खामकर यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खडकी, पुणेचे प्राचार्य डॉ. प्रा. संजय चाकणे राहणार आहेत.

### ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**पुणे :** मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत भारत निवडणूक आयोगाकडून सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून त्याअन्वये ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. तर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या दावे व हरकतींवर २९ ऑक्टोबर पर्यंत सुनावण्या घेण्यात येणार आहेत, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित साप्ताहिक बैठकीत दिली. त्या पुढे म्हणाल्या, प्राप्त झालेल्या दावे व हरकतींवर सुनावण्या घेण्याच्या अनुषंगाने प्रशासना कडून मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रासाठी उपमुख्यमंत्र्यांचा रोडमॅप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न कायम स्वरूपी सोडविण्यासाठी तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. उद्योजकांच्या अडचणी दूर करून उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्राची पाहणी करून रस्ते दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर उद्योजक व औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार शरद सोनवणे,



आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

चाकण-शिक्रापूर मार्गावरील खड्ड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता एम-६० हार्डनर, जिओ पॉलिमर टेक्नो पॅच आणि एम-६ आरएमसी तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते दुरुस्ती करण्यात येत आहे. या तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत खड्डे बुजवून वाहतूक पूर्ववत करणे शक्य होत आहे. खराब झालेल्या

**औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नोडल समिती स्थापन करण्यात आली असून, तिची बैठक दर शुक्रवारी होणार आहे. रस्ते, ड्रेनेज, फुटपाथ, स्ट्रीट लाईट यांसह पायाभूत सुविधांवर समितीमार्फत लक्ष दिले जाणार आहे. तळेगाव-शिक्रापूर ५४ किलोमीटर मार्ग, नाशिक फाटा-राजगुरुनगर मार्ग आणि अंतर्गत रस्त्यांच्या विकासाला गती देण्यात येणार आहे.**

ठिकाणी प्री-कास्ट पॅनेल बसविण्याचे कामही सुरू आहे.

रस्ते विकासात फुटपाथ, युटिलिटी आणि सायकल ट्रॅकचा समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कामगारांचा प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात टाउनशिप उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे. निगडी-चाकण, चाकण-राजगुरुनगर आणि तळेगाव-शिक्रापूर मेट्रो मार्गांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश महामेट्रोला देण्यात आले आहेत. उद्योजकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंते व अधिकारी आठवड्यातून एक दिवस औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध राहणार आहेत. वीज ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविणे, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा आणि पोलीस प्रशासनाशी संबंधित प्रश्न सोडविण्याबाबतही निर्णय घेण्यात आले. शासनाच्या उपाययोजनांमुळे उद्योजकांनी उद्योग स्थलांतराचा निर्णय बदलल्याचे बैठकीत स्पष्ट झाले.

## पाटस येथे दवाखाना आहे पण डॉक्टर सतत गैरहजर !

### नागरिकांना खाजगी रुग्णालयात घ्यावा लागतो उपचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड** : दौंड तालुक्यातील पाटस येथील सरकारी आरोग्य उपकेंद्र उघडं असतं परंतु डॉक्टर सतत गैरहजर असल्याचा धक्कादायक प्रकार वारंवार उघडकीस येत आहे. त्यामुळे येथे उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची म ोठ्या प्रमाणात हेळसांड होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. शासनाने आरोग्य उपकेंद्रावर करोडो रुपये खर्च करून इमारत बांधून सर्व सुख सुविधा त्या ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तरीही त्या ठिकाणी कर्तव्यास असलेले डॉक्टर व इतर कर्मचारी कामाची वेळ पाळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

सरकार सर्वांना योग्य उपचार मिळावा यासाठी आरोग्यावर भरमसाठ खर्च करत असताना दवाखान्यात कर्तव्यात असलेले डॉक्टरच वेळेवर उपलब्ध नसतात तर सतत गैरहजर असतात आणि कामाची वेळही पाळत नाही. त्यामुळे प्राथमिक उपचारापासून नागरिकांना वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे आयुष्यमान भारत कसा होणार ? हा एक मोठा प्रश्न आहे.

सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचारासाठी आल्यानंतर दवाखाना उघडा असतो परंतु डॉक्टर उपस्थित नसतात. त्यामुळे परिणामी रुग्णांना उपचार घेण्यासाठी




**डॉक्टर वेळेत उपस्थित नसल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाही. कधी दवाखाना बंद असतो तर कधी दवाखाना चालू असून डॉक्टर नसतात, त्यामुळे संबंधित डॉक्टरांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.**
**- संजय शिंदे, जय शिवसंग्राम पुणे जिल्हा उपाध्यक्ष, दौंड तालुका अध्यक्ष.**

खाजगी दवाखान्याची वाट धरावी लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा दोन्ही गोष्टींचे नुकसान होते. कामात कुचराई करणाऱ्या आणि सतत गैरहजर असणाऱ्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. काम ावर नसतानाही हजेरी दाखवून कर्मचाऱ्यांचे पगार नक्की कोण करत... ? वरीष्ठ अधिकारी काय करतात याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. परिसरातील अनेक गावांतून नागरिक उपचारासाठी येथे येतात परंतु पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसतात त्यामुळे ग्राम स्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

## पूर्व आंबेगावात चोरट्यांचे लक्ष विजतारांकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात डिझेल चोरीच्या घटनांनंतर आता चोरट्यांनी विद्युत तारांना लक्ष्य केले आहे. लोणी येथील वीज उपकेंद्रातून मांदळेवाडीला वीजपुरवठा करण्यासाठी उभारलेल्या विद्युत पोलवरील सुमारे दहा पोलच्या विद्युत तारा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना शनिवारी मध्यरात्री घडली.

**ग्रामपंचायत सरपंच उज्वला आदक आणि उपसरपंच रवि ढगे पाटील यांनी सांगितले की, विद्युत तारा ओढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. मात्र, चोरट्यांनी तारा लंपास केल्याने मांदळेवाडीचा वीजपुरवठा सुरू करण्यास विलंब होणार आहे. विद्युत साहित्य चोरी करणाऱ्या चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी तसेच विद्युत कामांना सुरक्षा द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.**

लोणी येथून मांदळेवाडीला वीजपुरवठा करण्यासाठी वडगावपीर येथील बैलगाडा घाटापासून ढगेवस्तीपर्यंत विद्युत पोल उभारण्यात आले आहेत. या पोलवरून हायटेंशन विद्युत तारा ओढण्याचे काम अंतिम टप्प्यात होते. त्यामुळे लवकरच मांदळेवाडी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होण्याची अपेक्षा होती. मात्र, तारांची चोरी झाल्याने हे काम रखडले आहे.यामुळे महावितरण तसेच संबंधित विद्युत ठेकेदाराचे आर्थिक नुकसान झाले आहे. वनविभागाच्या परवानग्या आणि विविध प्रशासकीय अडचणींच्या पार्श्वभूमीवर विद्युत कामांना चोरट्यांच्या उपद्रवाचीही भर पडली आहे.

## हजारो शिवभक्त सोमेश्वरला दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील प्रसिद्ध श्रावण महिन्यानिमित्त करंजे येथील श्री सोमेश्वर स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनासाठी विविध जिल्ह्यातून आलेल्या हजारो शिवभक्तांची गर्दी होत आहे. श्रावणी दुसऱ्या सोमवारी(दि २४) ऑगस्ट रोजी सकाळपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

'हर हर महादेव', 'ॐ नमः शिवाय'च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला असून, भाविकांकडून सोमेश्वराचे दर्शन घेऊन अभिषेक, पूजा व बेलपत्र अर्पण केले जात आहे.

महापूजा बारामती प्रांताधिकारी उत्तम दिघे सपत्नीक सोमेश्वर साखर कारखाना अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप , पुणे जिल्हा पीडीसी बँक संचालक संभाजी होळकर यांच्या हस्ते पार पडली यावेळी वडगाव पंचायत समिती जितेद्र पवार करंजे सरपंच भाऊसो हुंबरे,सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी व सचिव सचिन भांडवलकर व विश्वस्त मंडळ उपस्थित होते,दुपारची खिचडी पुष्पा खोमणे ,संगीता खोमणे ,राहुल कडव ,बाबासाहेब शिंदे यांनी दिली तर सायंकाळचा महाप्रसाद शिवभक्तांकडून होता.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात आवश्यक त्या सुविधा व नियोजन देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात आले असल्याचे देवस्थान चेअरमन अनंत मोकाशी व सचिव सचिन भांडवलकर यांनी सांगितले. श्रावण महिन्यानिमित्त दुसऱ्या सोमवारी सोमेश्वर मंदिर व मंदिर परिसर गजबजुन गेला आहे परिसरात विविध प्रकारचे पाळणे, खेळणी व विविध दुकानांनी परिसर गजबजला आहे. प्रसाद, खाद्यपदार्थ तसेच विविध वस्तूंच्या दुकानांनी नटला आहे. दर्शनासाठी येणाऱ्या हजारो शिवभक्तांमुळे परिसराला यात्रेचे स्वरूप आले आहे. लहान मुलांसाठी विविध प्रकारचे पाळणे व खेळण्यांची दुकाने आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. तर भाविकांसाठी पूजेचे साहित्य, बेलपत्र, हार-फुले, प्रसाद आणि विविध खाद्यपदार्थांची दुकाने थाटण्यात आली आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने हे कळवण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत/सदनिका ही श्रीमती मीनाबाई अशोक डोंगरे यांच्या मालकी वहिवाटीची होती. व दिनांक १६/०४/२०२६ रोजी सह-दुय्यम निबंधक हवेली क्र. १८ यांचे कार्यालयात अनुक्रमांक १२१२१/२०२६ ने नोंदवण्यात आलेल्या नोंदणीकृत बक्षीस पत्राद्वारे त्यांनी सदरची मिळकत ही त्यांचा मुलगा श्री. दत्तात्रय अशोक डोंगरे यांना कायम स्वरूपी दान केलेली आहे. अशा रीतीने श्री दत्तात्रय अशोक डोंगरे यांना सदर मिळकती/सदनिका संदर्भात पूर्णपणे कायदेशीर हक्क व अधिकार प्रस्थापित झालेले आहेत. सदरील श्री दत्तात्रय अशोक डोंगरे हे एच.डी. बी. फायनान्शिअल सर्विसेस लिमिटेड यांचेकडून सदरची सदनिका तारण ठेवून कर्ज घेण्यास इच्छुक आहेत. व सदरील विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत/सदनिका पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा ही दिलेला आहे. तेव्हा सदर मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारे खरेदी-विक्री, गहाण, दान, ताबा, बक्षीस,लीज, लिन, कुळ, खंड, साठेखत करार, कुलमुखत्यार पत्र, दावा वाद, ताबा वहिवाट, अगर अन्य हक्क संबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसात आमची मूळ कागदपत्रांसह खात्री करून द्यावी. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे व ज्याचा हक्क आहे तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल व मागाहून कोणतीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे पोट तुकडे तालुका हवेली गाव मध्ये पिंपरी वाघेरे येथील सिटीएस नंबर ६५८८, ६५८८/१ ते ६५८८/१४ यावर बांधण्यात आलेल्या 'श्रीराम अपार्टमेंट सी बिल्डींग' या गृह प्रकल्पातील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्रमांक. १०२ यांसी क्षेत्र २९.८६ चौ. मी. कारपेट व संलग्न बाल्कनी यांसी क्षेत्र ४.४० चौ. मी. असे एकूण क्षेत्र ३४.२६ चौ. मी. यासी सेलेबल बिल्ट-अप क्षेत्र ४९७.६६ व एक कार पार्किंग ही संपूर्ण चतु: सीमा पूर्वक मिळकत.

**ॲडव्होकेट रविराज कुलकर्णी**
**अपेक्स लिगल कन्सल्टंट करिता,**
**पत्ता :** ए -८०२, अनुपम सोसायटी,फायनल प्लॉट नंबर :१०००/२+३, सी.टी.एस.नंबर १५८/ सी/८( पार्ट),पत्रकार भवन जवळ, नवी पेठ पुणे-४११०३०.**मो : ९६५७७२५५८५**

**दि. 25/08/2026**


# शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्टला प्रतिष्ठेचा 'शिवसह्याद्री आधारवड पुरस्कार'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा गौरव करणारा यंदाचा प्रतिष्ठेचा 'शिवसह्याद्री आधारवड पुरस्कार २०२६' शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्टला प्रदान करण्यात आला. पुणे येथे झालेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात ट्रस्टचे अध्यक्ष यशवंत गोसावी यांनी सहकाऱ्यांसम वेत हा पुरस्कार स्वीकारला.

राज्यातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि सामाजिक उपक्रम राबविणारी अग्रगण्य संस्था शिवसह्याद्री फाउंडेशन दरवर्षी समाजहितासाठी भरीव योगदान देणाऱ्या एका संस्थेचा 'शिवसह्याद्री आधारवड पुरस्कार' देऊन गौरव करते. यावर्षी हा मान गेली १२ वर्षे अनाथ, निराधार तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षण, संगोपन आणि उज्वल भविष्यासाठी कार्यरत असलेल्या शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्टला मिळाला.

या सोहळ्याला एमकेव्हीडीसीचे संचालक हेमंतजी धुमाळ, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड, एमईएचे अध्यक्ष विक्रम जी गायकवाड, बडेकर ग्रुपचे प्रमुख प्रवीण बडेकर यांच्यासह राज्यातील उद्योग, सामाजिक




आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी शिवसह्याद्री परिवाराचे प्रमुख राजेंद्र कोंढरे यांनी शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्टच्या कार्याचा गौरव करत, शिवनिश्चल ट्रस्टचे कार्य म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक विचारांचा खरा वारसा जपणारे कार्य आहे, असे गौरवोद्गार काढले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर ट्रस्टचे अध्यक्ष यशवंत गोसावी यांनी मनोगत व्यक्त करत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा प्रश्न हा केवळ कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा एका संस्थेचा विषय नसून कृषिप्रधान भारतासमोरील अत्यंत गंभीर सामाजिक प्रश्न असल्याचे ठामपणे सांगितले. त्यांच्या संवेदनशील आणि अभ्यासपूर्ण भाषणाने सभागृहातील उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

या प्रसंगी पूनम गोसावी, आनंद पवार, प्रतीक बागुल, ललित सूर्यवंशी यांच्यासह शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्टचे अनेक सहकारी उपस्थित होते.

## रस्ते १५ दिवसांत दुरुस्त करा; अन्यथा अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** पुणे शहर व उपनगरांतील रस्त्यांची दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालक व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून १५ दिवसांत खड्डे बुजवावेत. त्यानंतरही रस्त्यांवर खड्डे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी श्री शिवछत्रपती प्रतिष्ठानने केली आहे.

याबाबत प्रतिष्ठानच्या वतीने पोलिस आयुक्तांना निवेदन देण्यात आले. महापालिका प्रशासनाकडून दरवर्षी रस्ते बांधणी व दुरुस्तीवर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र, शहरातील अनेक मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अवस्था अद्याप खराब आहे. निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे अपघात होऊन नागरिकांचा जीव धोक्यात येत असून, वाहतूक कोंडीलाही सामोरे जावे लागत आहे.

महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील सर्व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी १५ दिवसांची मुदत निश्चित करावी. मुदतीनंतरही खड्डे कायम राहिल्यास संबंधित कनिष्ठ अभियंता, उपअभियंता आणि सहायक आयुक्तांवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.रस्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा श्री शिवछत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवदास पवार यांनी दिला आहे.


## ग्रामपंचायत महाळुंगे ता. खेड जि. पुणे

## जाहीर निविदा

ग्रामपंचायत महाळुंगे (इं.) ता.खेड जि.पुणे यांचेकडील महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा ठेकेदाराकडुन म ागविण्यात येत आहे. निविदा नमुना आमपंचायत महाळुंगे (ई.) ता.खेड जि.पुणे यांचेकडुन दिनांक २५/०८/२०२६ ते दिनांक ०१/०९/२०२६ दुपारी २.०० वा पर्यंत देण्यात येतील व भरुन पाठवलेली मोहरबंद निविदा सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत स्वोकारल्या जातील व शक्य झाल्यास मुदतीच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता उघडण्यात येतील.

| अ.नं. | कामाचे नाव | निधीस्तर | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | एम.आय.डी.सी.चौक ते पुला पर्यंत नळ पाणी पुरवठा पाईप लाईन विस्तार करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,५१,९२१/- | १,५२०/- | ५००/- |
| २ | भोसले वाडा पांडुरंग भोसले ते मेन रोड बंदिस्त गटर करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,७५,६९४/- | १,७५६/- | ५००/- |
| ३ | महाळुंगे आंबेठाण रोड ते सुरेश शिवळे मिळकत पर्यंत न.पा.पु. पाईप लाईन विस्तार करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,६४,०६२/- | १,६४०/- | ५००/- |
| ४ | गावातील विविध ठिकाणचे चेंबर दुरुस्त करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | २,९९,३००/- | ३,०००/- | ५००/- |
| ५ | भैरवनाथ नगर संतोष भोसले ते सुर्यकांत इंगवले मिळकत बंदिस्त गटर करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | ६,९६,०८७/- | ६,९६०/- | ५००/- |
| ६ | बेंदवस्ती- श्री. मच्छिंद्र भांगरे मिळकत ते रामचंद्र भांगरे मिळकत नळ पाणी पुरवठा विस्तार करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,८२,०९४/- | १,८२०/- | ५००/- |
| ७ | चाकण तळेगाव रस्ता मेन वॉल ते सचिन -भोपे मिळकत पर्यंत न.पा.पुरवठा विस्तार करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,१६,५७०/- | १,१६५/- | ५००/- |
| ८ | जोपाईवाडी नळपाणी पुरवठा पाईप लाईन स्थलांतरीत (शिफ्ट) करणे | १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी | १,१९,५७५/- | १,१९५/- | ५००/- |

**सुचना-** (१) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखुन ठेवला आहे.
(२) कोणती निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखुन ठेवला आहे.
(३) सदर निविदा बंद लिफाफा मध्ये आवश्यक आहे.
(४) सोबत पुढिल प्रमाणे कागदपत्र आवश्यक
कागदपत्र - (१) नोंदणी प्रमाणपत्र (२) पॅन कार्ड (३) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन
तरी या प्रमाणे निविदा प्रसिध्द करणेस विनंती. कळावे.

**आपला विश्वासु**

**स्वाक्षरी/-**
**श्री. बापु बबन गोरे**
**ग्रामपंचायत अधिकारी**

**स्वाक्षरी/-**
**सौ. अर्चना मुकूंद महाळुंगकर**
**प्रशासक**

**ग्रामपंचायत महाळुंगे इंगळे, ता. खेड, जि. पुणे. करिता.**

# फुलांबरोबरच बळीराजाची स्वप्नेही गळताहेत!

## फुलोऱ्यात आलेल्या पिकांची दयनीय अवस्था; खरीप हंगाम संकटात; तालुका दुष्काळाच्या उंबरठ्यावर

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पावसाअभावी बहारात आलेल्या खरीप हंगामातील पिकांना मोठा पाण्याचा ताण बसला असून फुलोऱ्यात आलेल्या पिकांची फुले गळू लागली आहेत. शेतात उमललेली फुले गळताना केवळ उत्पादनाची आशाच नाही तर बळीराजाने पाहिलेली स्वप्नेही डोळ्यांसमोर गळून पडत असल्याचे हृदयद्रावक चित्र तालुक्यात पाहायला मिळत आहे. तालुक्यातील बहुतांशी जलस्रोत कोरडे ठाक असून पिण्याचे पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तालुका दुष्काळाच्या उंबरठ्यावर आल्याचे चित्र दिसून येत आहे.

पेरणीच्या सुरुवातीपासूनच पावसाने लपंडाव सुरू केल्याने तुरळक पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी सोयाबीन, बाजरी, तूर, मूग तसेच चारा पिकांची पेरणी केली. सुरुवातीला झालेल्या रिमझीम पावसामुळे पिकांनी उभारी घेतली. सोयाबीन,मुगाला फुलोरा आला आणि शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. फुलोऱ्यात आलेल्या पिकांना पाण्याची नितांत गरज असताना पाऊसच गायब झाल्याने फुले गळून पडत आहेत.

पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक ठिकाणी पाने सुकू लागली असून फुलोरा टिकविण्यासाठी आवश्यक असलेला ओलावा जमिनीत राहिलेला नाही. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने, खर्च करून आणि उधारी-उसणवारी करून उभी केलेली पिके आता डोळ्यांसमोर कोमेजताना पाहण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

पावसाळ्याचे तीन महिने उलटत आले तरी तालुक्यातील तलाव, बंधारे, नाले आणि नदीपात्रांमध्ये अद्याप पाण्याचा स्पर्शच झाला नाही. सीना, शुढळा, केळ, खारोळी यांसह बहुतांश नद्या कोरड्याच असून लहान-मोठे जलसाठेही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. ऑगस्ट संपत आला तरी १९ गावांना अद्याप टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पावसाळ्यातही गावांची तहान टँकरवर भागवावी लागत असल्याने भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता स्पष्ट होत आहे. दमदार पावसाअभावी आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह, पशुधन, चाऱ्याचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

सोयाबीन, बाजरी, तूर यांसह चारा पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. खरीप हंगामच अडचणीत सापडल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होण्याची भीती आहे. खरीपच संकटात सापडल्याने रब्बीच्या आशा देखील मावळत चालल्या आहेत. जलस्रोत कोरडे, पिके तहानलेली, फुलोऱ्यात असलेल्या पिकांची गळणारी फुले आणि आभाळाकडे लागलेल्या बळीराजाच्या नजरा अशी विदारक परिस्थिती तालुक्यात निर्माण झाली आहे. बळीराजाला मोठ्या दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

**पिकांपेक्षा चिंताच जास्त उगवली !**

यंदा शेतात पिकापेक्षा चिंताच जास्त उगवली आहे. पेरणी पासूनच पावसाअभावी खरीप पिकांची हेळसांड झाली आहे. कर्ज काढून केलेली पेरणी अन् पिकांची झालेली दयनीय अवस्था शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणार आहे.

**देविदास कासार**



पेरणी करताना डोळ्यांसमोर हिरवंगार शिवाराचं स्वप्न होतं. त्याच शिवारात पिकं कोमेजताना पाहून काळजात कालवाकालव होते. वरुणराजाने कृपा करावी. पावसाअभावी बळीराजा मोठ्या चिंतेत सापडला आहे.

**विकास म्हस्के**

---

## सुशील थोरात हल्लाप्रकरणी ‘मोक्का’ अंतर्गत कारवाई करा

### पत्रकार संघाची पोलीस स्टेशन व तहसीलदारांकडे मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**सुपा :** अहिल्यानगर जिल्ह्यात पत्रकारांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढत असून, गुंडगिरीचा विळखा आता थेट पत्रकारांच्या सुरक्षेपर्यंत पोहोचला आहे. साम टीव्हीचे पत्रकार सुशील थोरात व त्यांचा मुलगा सार्थक यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे पत्रकारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यातील आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी पारनेर तालुका पत्रकार संघाने केली आहे.

याबाबत पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने पारनेर पोलीस स्टेशन व तहसीलदार, पारनेर यांना निवेदन देण्यात आले. पत्रकारांवर सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पत्रकार निर्भयपणे आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर हल्ले होणे ही चिंतेची बाब असल्याचे संघाने निवेदनात नमूद केले आहे. सुशील थोरात व त्यांचा मुलगा सार्थक यांच्यावर झालेल्या हल्ल्याची गंभीर दखल घेऊन संबंधित आरोपींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. पत्रकारांवरील हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत.

यावेळी पत्रकार मार्तंड बचुडे, शिवाजी पानमंद, उदय शेरकर, शरद झावरे, विनोद गोळे, भास्कर कवांद, शशी भालेकर, सतीश रासकर, संतोष सोबले, विशाल फटांगडे, जयदीप कारखिले, किरण शिंदे, मुकुंद निघोजकर, जय हरेल, योगेश खाडे, दत्तात्रय उनवणे आदी उपस्थित होते.

---

## विद्यार्थ्यांना पोस्को कायद्याबाबत मार्गदर्शन

### लैंगिक अत्याचाराविरोधात जनजागृती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** बालकांवरील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती मिळावी, या उद्देशाने मदत सोशल फाउंडेशनच्या अंतर्गत पोस्को अँक्ट २०१२ संदर्भात जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

समाजसेविका अँड. मोनाश्री अहिरे (शिंदे) यांनी संत तुकाराम माध्यमिक आश्रमशाळा, आल्हणवाडी (ता. पाथर्डी) तसेच न्यू इंग्लिश स्कूल, पाथर्डी येथील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकांवरील लैंगिक अत्याचाराची विविध रूपे, पोस्को कायद्यातील तरतुदी, बालकांचे कायदेशीर हक्क, सुरक्षित वर्तन तसेच कोणतीही अनुचित घटना घडल्यास विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनीही या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बालकांच्या सुरक्षिततेसाठी पालक, शिक्षक आणि समाजाने सजग राहणे आवश्यक असून, मुलांना भीती न बाळगता आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठविण्यासाठी सक्षम करणे गरजेचे असल्याचे अँड. मोनाश्री अहिरे यांनी सांगितले.

यावेळी शाळेचे पदाधिकारी, श्रीधर शेलार, अँड. शितल डमाळे उपस्थित होते.

---

## लेखी आश्वासनानंतर इरफान पिरजादे यांचे आमरण उपोषण स्थगित



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पेडगाव ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी ग्रामस्थ व लोकनियुक्त सरपंच-उपसरपंच सदस्य इरफान भैय्या पिरजादे यांनी सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. प्रशासनाकडून मागण्यांबाबत लेखी आश्वासन मिळाल्यानंतर हे उपोषण स्थगित करण्यात आले. पेडगाव परिसरातील शाळेपासून ५० मीटर अंतरातील अवैध धंदे तसेच गावठी दारू विक्रीवर कायदेशीर कारवाई करून हे धंदे बंद करावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली होती. तसेच नागोबा वस्ती, ईदगाह वस्ती, अधोरेवाडी, भवानी माता व शंकरनगर परिसरातील सिंगल फेज वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी मागणीही करण्यात आली होती.

याशिवाय MDR-६२ श्रीगोंदा-पेडगाव रस्त्याचे बंद असलेले काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी उपोषणाच्या माध्यमातून करण्यात आली. रस्त्याचे काम रखडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या मागण्यांबाबत संबंधित प्रशासनाकडून लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर इरफान भैय्या पिरजादे यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले. त्यामुळे प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते, याकडे आता पेडगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. लेखी आश्वासन मिळाले, उपोषण थांबले; आता आश्वासनाची अंमलबजावणी होणार का, हा खरा सवाल ग्रामस्थांसमोर आहे.

---

## निष्ठावान कार्यकर्त्यांची ताकद माझ्या पाठीशी : आ. राजळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील काही गावांना विरोधकांच्या विरोधी भुमिकेमुळे निधी देण्याची इच्छा असताना निधी देता आला नाही.परंतु आता तुमच्या तालुक्यांच्या हक्काच्या माणुस बापुसाहेब पाटेकर यांची जिल्हा नियोजन मंडळावर निवड झाली असून त्या माध्यमातून विकास काम करतांना निश्चित तालुक्याला न्याय मिळणार असुन ढोरजळगांच्या विकास कामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही आ. मोनिका राजळे यांनी बोलताना दिली.

ढोरजळगांव ता. शेवगांव येथील श्रीराम मंदिर येथे आमदार मोनिका राजळे यांची सलग तिसऱ्यांदा आ. म्हणून निवड झाल्याबद्दल पेढेतुला व बापुसाहेब पाटेकर यांची वृध्देश्वर साखर कारखाना संचालकपदी व जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार कार्यक्रमाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात आ. राजळे बोलत होत्या. यावेळी हभप भाऊसाहेब महाराज भालसिंग, बापुसाहेब भोसले, उमेश भालसिंग, डॉ विश्वास जायभाये, अरूण पाटेकर, शिवाजीराव भिसे, भिमराज सागडे, महेश फलके, कचरू चोथे, संदीप वाणी, सचिन वायकर, गणेश कराड, अण्णासाहेब पाटेकर, ज्ञानेश्वर उगले, गणेश रांधवणे, रघुवीर उगले, मिनाताई कळकुंबे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महादेव पाटेकर, अनंता ऊकिडे, प्रदीप पाटेकर,आकाश साबळे, पांडुरंग पाटेकर,गणेश गरड, गणेश जायभाये,गणेश चने, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दिपक कुसळकर यांनी केले. आभार अनंता ऊकिडे यांनी मानले.

---

## ताजनापूर उपविभागासमोर माळेगाव-ने च्या शेतकऱ्यांचा घेराव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** ना कुठल्या पक्षाचा झेंडा, ना कुठल्या नेत्याचा फोटो... पाणी आणि शेतकरी हाच आमचा पक्ष! असा हुंकार भरत तालुक्यातील माळेगाव-ने येथील शेतकरी, महिला व युवकांनी आज (सोमवार) ताजनापूर मध्यम प्रकल्प बांधकाम उपविभाग क्रमांक १ या शेवगाव येथील कार्यालयास घेराव घातला. गेल्या सहा महिन्यांपासून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अनास्थेमुळे पॅनल बॉक्सचे काम प्रलंबित राहिल्याने हक्काच्या पाण्यापासून वंचित राहणाऱ्या संतप्त ग्रामस्थांनी कार्यालयासमोर ठाण मांडून प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढले.दरम्यान, आंदोलनावर तोडगा न निघाल्याने आज कार्यालयासमोर मुक्काम ठोकणार असल्याचे शेतकऱ्यांनी जाहीर केल्याने प्रशासनाची पुरती धांदल उडाल्याचे पहावयास मिळाले. माळेगाव-ने परिसरातील इनाम पाणलोट,खबडा पाणलोट, मोळाचा ओढा (शिवापासूनचे पाणलोट), शिप्याच्या झऱ्यापासूनचे पाणलोट, खडखडीचे पाणलोट, वाघिनीचे पाणलोट, हाडुळा येथील पाणलोट आदि सात पाणलोट क्षेत्र व त्याखालील बंधाऱ्यात तातडीने पाणी सोडावे तसेच वर्षातुन किमान सहा वेळा धरणातील पाण्याने हे पाणलोट क्षेत्र भरून मिळाले पाहिजेत या मुख्य मागणीसाठी ‘ताजनापूर लिफ्ट योजने’चे जनक अँड. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन छेडण्यात आले आहे. पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडून दुग्ध व्यवसायासह जनावराच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याच्या प्रश्न देखील गंभीर बनला आहे. ज्या गावाने ताजनापूर योजनेच्या मंजुरीसाठी मोलाची भूमिका बजावली, त्याच माळेगाव-ने ला पाण्यापासुन प्रशासनाकडून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जात असल्याचा गंभीर आरोप यावेळी बोलताना अँड. काकडे यांनी यावेळी केला. धरण भरले असून नदीद्वारे पाणी सोडून दिले जात आहे.

---

## द•ख•ल



### अंगणवाडी बालकांच्या विकासाचा खरा पाया : काकडे

**हातगाव :** अंगणवाडी ही केवळ बालकांना शिक्षण देण्याची केंद्र नसून त्यांच्या बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक विकासाचा पाया मजबूत करणारे केंद्र आहे. बालसंगोपनासोबतच मुलांच्या विचारशक्तीला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अंगणवाडीच्या माध्यमातून होत असल्याचे प्रतिपादन बोधेगावचे उपसरपंच संग्राम काकडे यांनी केले. बोधेगाव येथील खेडकर वस्ती येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या डिजिटल अंगणवाडीच्या उद्घाटनप्रसंगी संग्राम काकडे बोलत होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बालकांना शिक्षणाची गोडी लागण्यास मदत होणार असून, ग्रामीण भागातील मुलांना डिजिटल शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होणे ही निश्चितच अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंदाताई बडे, शाहुराव खंडागळे, बेबीताई भोंगळे, काकडे मॅडम, सुरेखा खेडकर, कावेरी मिसाळ, शिवाजी खेडकर यांच्यासह बोधेगाव गटातील अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. डिजिटल अंगणवाडीमुळे परिसरातील बालकांना पारंपरिक शिक्षणासोबतच आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे मुलांमध्ये शिकण्याची उत्सुकता, आकलन क्षमता आणि सर्जनशीलता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बोधेगाव गटातील अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी विशेष प्रयत्न केले.

### प्रभूवाडगावात चोरट्यांचा धुमाकूळ घरफोडीत दीड लाखांचा ऐवज लंपास

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील प्रभूवाडगाव येथे चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, घराचा कडी-कोयंडा तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा तब्बल १ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. गावात प्रभू स्वामी मंदिरात सुरू असलेल्या सप्ताहातील कीर्तनासाठी ऐकण्यासाठी घरातील अनेक व्यक्ती गेल्याची संधी साधून ही घरफोडी करण्यात आली. त्याच रात्री गावातील अनेक ठिकाणी चोरीचे प्रयत्न झाल्याची माहिती समोर आल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत बबन कोंडीबा जायभाय (वय ७४, रा. प्रभूवाडगाव) यांनी शेवगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. गुरुवारी (दि. २०) रात्री ७ ते ९:३० च्या दरम्यान ही घडली असून जायभाय यांच्या घरातील व्यक्ती सप्ताहातील कीर्तनासाठी गेल्याची संधी साधून चोरट्यांनी घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेण्यात आली. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये नात दिव्या हिचे अंदाजे दहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस, सून आशाबाई हिचे आठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी-मंगळसूत्र, पत्नी इंदुबाई यांच्या कानातील, नाकातील व गळ्यातील सुमारे पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच २२ हजार ५०० रुपये रोख रकमेचा समावेश आहे. या घटनेप्रकरणी शेवगाव पोलिस ठाण्यात एका संशयितासह तीन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावात वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याने पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच घरफोडीच्या घटनेचा जलद तपास करून चोरीस गेलेला ऐवज परत मिळवून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या प्रकरणी शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास निरीक्षक बोरसे यांचे मार्गदर्शनाखाली पो. हे. कॉ. ईश्वर गर्जे करीत आहेत.

### चिचोंडी येथे हॉटेल फोडून गॅस टाक्याची चोरी

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथील जय भगवान हॉटेलच्या पाठीमागील दरवाजा उचकटून चोरट्याने हॉटेलमधील व्यावसायिक गॅस टाकी व तीन गॅसने भरलेल्या टाक्या चोरून नेल्या. ही घटना रविवारी रात्री घडली. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, हॉटेल जय भगवानचे मालक बाबासाहेब आव्हाड यांनी नेहमीप्रमाणे रविवारी दिवसभर धंदा करून रात्री ९ वाजता हॉटेल बंद करून घरी गेले. सोमवारी सकाळी ६ वाजता हॉटेल उघडण्याकरता आल्यानंतर हॉटेलचे शटर उघडून आज प्रवेश केला. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, आपल्या दुकानचे पाठी मागील दरवाजा उघडला आहे. त्यावेळी त्यांनी हॉटेलमध्ये शोधाशोध केली असता त्यांना हॉटेलमधील गॅसच्या टाक्या चोरीला गेल्याचे लक्षात आले. सध्या पाऊस न झाल्यामुळे ग्रामीण भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर छोट्या मोठ्या चोऱ्या घडत आहेत. त्यामुळे पोलिसांनी गस्त वाढवावी. अशी मागणी नागरिकांच्या चर्चेतून पुढे येत आहे.

### भगवान बाबा मंदिराजवळ स्वयंपाक खोलीचे लोकवर्गणीतून भूमिपूजन



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथील जय भगवान मंदिरयेथेस्वयंपाकासाठी खोली नसल्यामुळे अनेक अडचणी सप्ताह काळात येत असत याचाच विचार करून जय भगवान मित्र मंडळानेआज सकाळी आठ वाजता लोकवर्गणीतून स्वयंपाक रूम चे भूमिपूजन पद्माकर आव्हाड तसेच वैभव खलाटेयांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाला घनश्याम आव्हाड, विठ्ठल गायकवाड, विलास आव्हाड, विठ्ठल पालवे, बंडू आव्हाड, नागेश आव्हाड, कार्तिक पालवे, राजेंद्र गरुड, अशोक पाथरकर, तुळशीदास पालवे, राजेंद्र डमाळे, तसेच जय भगवान मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेवगाव तालुक्यात १८ गावात १४ टँकरने २८ खेपाद्वारे पाणी पुरवठा सुरू

**हातगाव :** शेवगाव तालुक्यात जवळपास असंख्य गावातील विहिरींनी तळ ठोकले असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असून सध्या तालुक्यातील १८ गावात १४ टँकरने २८ खेपाद्वारे पाणी पुरवठा सुरू असल्याबाबतची माहिती गटविकास अधिकारी महेश दहिफळे यांनी आमचे प्रतिनिधीजवळ बोलताना दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, चालू हंगामात पावसाळ्याचा जून, जुलै व ऑगस्ट महिना संपत आला असून अजूनही तालुक्यात कुठेच नदी, नाले व ओढे वाहण्याइतपत पाऊस झाला नसल्याने अनेक गावातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न डोकावत असून आज रोजी सध्या तालुक्यातील ज्या १८ गावासह वाड्यावस्त्यांना पाणी पुरवठा सुरू आहे.

---

## रक्षाबंधन सणासाठी कर्जतच्या बाजारात सजले राख्यांचे स्टॉल

### लाडक्या बहिणींनी भावासाठी खरेदी केल्या राख्या

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** शुक्रवारी होणाऱ्या बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाच्या सणासाठी सोमवारी कर्जतच्या आठवड्या बाजारात विविध रंगांच्या आकर्षक राख्यांचे स्टॉल सजले आहेत. सोमवारी राखी खरेदीसाठी बहिणींनी बाजारपेठेतील या राख्यांच्या स्टॉलवर गर्दी केली होती. दहा रुपयांपासून ते दीडशे रुपयांपर्यंतच्या राख्या बाजारात उपलब्ध आहेत.

**एक धागा प्यार का... कन्या विद्यामंदिराच्या विद्यार्थिनींनी भारतीय सैनिकांसाठी पाठवल्या राख्या**

कर्जतच्या सोनमाळी कन्या विद्यामंदिराच्या विद्यार्थीनीनी आपल्या हातांनी राख्या बनवत त्या सीमेवरील भारतीय जवानांसाठी पाठवल्या. मुख्याध्यापिका मेहजबीन पठाण यांनी विद्यार्थिनींनी बनवलेल्या राख्या भारतीय सैन्य दलाकडे सुपूर्द केल्या. या राखीसोबत कर्जतच्या चिमकुल्या बहिणींनी आपल्या जवान बांधवांसाठी आपण सीमेवर उभे असल्यानेच आम्ही घरात सुरक्षित आहोत. आपल्या शौर्यास मनापासून सलाम असा संदेश पाठवत भारतीय सैन्यांच्या प्रती आदर आणि स्नेह व्यक्त केला.

शुक्रवार, दि २८ रोजी रक्षाबंधन सण साजरा होणार आहे. बहीण-भावाच्या नाते अधिक दृढ होण्यासाठी या दिवशी बहीण आपल्या भावाच्या हातावर विश्वासाचे आणि प्रेम-स्नेहाचे प्रतीक म्हणून राखी बांधते. सोमवारी कर्जतच्या आठवडे बाजारात रक्षाबंधन सणासाठी आकर्षक आणि विविध रंगांच्या रंगीबेरंगी राख्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. यंदा बाजारात पारंपरिक राख्यांसोबतच ब्रेसलेट स्टाईल, कस्टमाईज्ड नावाच्या राख्या, मोती-मणी व विविध डिझाईनच्या राख्या उपलब्ध करण्यात आल्या. लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी विविध कार्टून व गेमिंग थीमच्या राख्यांनाही विशेष मागणी असल्याने त्या देखील राखी विक्रेत्यांनी लाडक्या बहिणींसाठी उपलब्ध ठेवल्या. यासह

काही ठिकाणी पर्यावरणपूरक तसेच हाताने तयार केलेल्या राख्याही विक्रीसाठी ठेवण्यात आल्या. यंदा राख्यांच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहक आकर्षक डिझाईनसोबतच आपल्या बजेटनुसार राख्यांची निवड करताना दिसत होते. शुक्रवारी रक्षाबंधन साजरा होणार असल्याने पुढील काही दिवसांत बाजारपेठेत खरेदीची गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे. अनेक शाळांमध्ये कार्यानुभव उपक्रम अंतर्गत विद्यार्थी आपल्या कल्पनेनुसार हस्तनिर्मित राख्यां बनवून रक्षाबंधनाच्या दिवशी तीच राखी आपल्या बहीणीकडून बांधत बहीण-भावंडच्या प्रेमाचं प्रतीक अधिक दृढ करतात.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## पत्रकार सुशील थोरात मारहाण प्रकरणी तिघांना अटक

### २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : 'आमच्या विरोधात बातम्या टाकतो का?' असे म्हणत पत्रकार सुशील थोरात यांना शिवीगाळ, दमदाटी करून बेदम मारहाण करत जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी तीन आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली. न्यायालयाने तिघांनाही २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्यातील अन्य तीन आरोपी अद्याप फरार आहेत.

२० ऑगस्ट रोजी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास आरोपींनी थोरात यांचा मुलगा सार्थक यांच्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर त्याला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर पत्रकार थोरात घटनास्थळी गेले असता सोनू दत्तात्रय कोहक, पप्पू दशरथ मते, विकी बाळासाहेब धवन व प्रशांत शिवाजी निकरड यांनी 'तू आमच्या विरोधात बातम्या टाकतो का?' असे म्हणत त्यांना लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडके व कोयत्याने मारहाण केल्याचा आरोप आहे. बंदूक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या हल्ल्यात थोरात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी सोनू कोहक, पप्पू मते व प्रशांत निकरड यांना छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेतले. त्यांना अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी देवकाते यांच्यासमोर हजर करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे ड. विक्रम शिंदे यांनी युक्तिवाद करत फरार आरोपींचा शोध, तसेच गुन्ह्यातील मोटारसायकल, बंदूक व हत्यारे जप्त करण्यासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने तिघांना २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## रोडवर धावत्या कारला भीषण आग, सुदैवाने जीवितहानी नाही



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा–साळवणदेवी रोडवर सोमवारी सकाळी सुमारास धावत्या टाटा इंडिका कारने अचानक पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. याबाबत नागरिकांच्या चर्चेतून समजलेली सविस्तर माहिती अशी की, सुनील यादव गाडे हे टाटा इंडिका कार (क्र. एमएच १६ एजे ६३५४) मधून अधोरेवाडी येथून श्रीगोंद्याच्या दिशेने येत होते. सकाळी १० वा.च्या सुमारास श्रीगोंदा–साळवणदेवी रोडवर त्यांच्या वाहनाने अचानक पेट घेतला.

काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने वाहनातून मोठ्या प्रमाणात धूर आणि ज्वाळा निघू लागल्या.घटना लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेतली. नागरिकांनी अग्निशमन दलाला माहिती देऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता प्रचंड असल्याने वाहनाला वाचविणे शक्य झाले नाही. काही वेळातच संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.या घटनेमुळे रस्त्यावर काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती. कारला नेमकी आग कशामुळे लागली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शॉर्टसर्किट किंवा वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असला तरी आगीचे निश्चित कारण स्पष्ट झालेले नाही. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर संबंधित यंत्रणेकडून पाहणी करण्यात येत असून, तपासानंतरच आगीचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## टाकळीभानचा अस्लम इनामदार आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान** : अहिल्यानगर जिल्ह्यातील टाकळीभानचा स्टार कबड्डीपटू अस्लम इनामदार याची जपानमधील आयची–नागोया येथे होणाऱ्या २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय पुरुष कबड्डी संघात निवड झाली आहे.

१९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत भारतीय संघ गतविजेता म्हणून मैदानात उतरणार आहे. भारतीय संघात १२ खेळाडूंचा समावेश असून अस्लमसोबत आशु मलिक, अयान लोहचब, देवांक दलाल, अर्जुन देशवाल, सुनील कुमार, जयदीप दहिया, राहुल सेथपाल, गौरव खत्री, सुमित सांगवान, अंकित जगलान आणि पवन सेहरावत यांची निवड झाली आहे.

अस्लम आणि पवन सेहरावत यांची अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली आहे. अस्लमने यापूर्वी २०२३च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावले होते. यंदाही त्याच्याकडून दमदार कामगिरीची अपेक्षा आहे. खेलो इंडिया, राज्य व राष्ट्रीय अजिंक्यपद तसेच प्रो कबड्डी स्पर्धांमध्ये त्याने सातत्यपूर्ण कामगिरी केली असून महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती पुरस्कारानेही त्याचा गौरव झाला आहे. अस्लमच्या निवडीचे वृत्त समजताच टाकळीभान येथे कबड्डीपटू, क्रीडाप्रेमी, युवक व ग्रामस्थांनी जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी करत त्याचे अभिनंदन करण्यात आले. महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन, जिल्हा कबड्डी संघटना, ओन्ली साई क्रीडा मंडळ, आझाद क्रीडा मंडळ तसेच ग्रामस्थांनी अस्लमला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रयत लक्ष्मी पतसंस्था गैरव्यवहार | मुख्य आरोपी आयुब शेखच्या अटकेचा मार्ग मोकळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील बहुचर्चित असलेल्या करंजी येथील रयत लक्ष्मी पतसंस्थेच्या बोगस कर्ज गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या व्यवस्थापक आयुब शेखला ३० एप्रिल २०२४ रोजी मिळालेले अंतरिम संरक्षण अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी रद्द केले आहे.या आदेशामुळे गैरव्यवहार प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या व्यवस्थापक आयुब शेखला कायद्यानुसार अटक करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती अँडव्होकेट कपिल मोरे व अँडव्होकेट गणेश गाढे यांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कोपरगाव तालुक्यातील करंजी येथील रयत लक्ष्मी पतसंस्थेचा व्यवस्थापक आयुब बनेमिया शेखने शेखने त्याचे व त्याच्या कुटुंबियांच्या नावाने नियमबाह्य बोगस कर्जे नावे टाकून संस्थेचा तब्बल ८४ लाख ४३ हजार १४६ रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे लेखापरीक्षण अहवालात निष्पन्न झाले प्रकरणी सहकारी संस्था,अप्पर लेखापरीक्षक अनिष सुनील पटेल यांनी कोपरगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सदरची तक्रार दाखल झाल्यानंतर आरोपी आयुब बनेमिया शेखविरुद्ध सदर रक्कमेचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

या गुन्ह्यात होणाऱ्या कारवाई पासून वाचण्यासाठी आरोपी आयुब बनेमिया शेखने न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी अर्ज दाखल करून रुपये २५ लाख रुपये पतसंस्थेत जमा करण्याचे आश्वासन मा.न्यायालयाला दिल्यामुळे १५ जुलै २०२५ मध्ये सबंधित गुन्ह्यास अटक झाल्यास त्यास अंतरीम संरक्षण देण्यात येवून न्यायालयाने दिलेल्या आदेशात रक्कम भरण्याबाबत पुढील निर्देश दिले होते. व आरोपीने न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यास दिलेले अंतरिम संरक्षण रद्द होईल असे स्पष्ट निर्देश मा.न्यायालयाने त्या आदेशात दिले होते. परंतु जवळपास एक वर्ष उलटूनही आरोपी आयुब बनेमिया शेखने न्यायालयाच्या आदेशाची अपेक्षित पूर्तता झाली नसल्याचा मुद्दा अँड.कपिल मोरे (अँड.गणेश गाढे यांच्या वतीने) यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला.

त्यामुळे १९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत अॅड. कपिल मोरे यांनी आरोपीकडून मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले नसल्याचा ठोस मुद्दा उपस्थित केला असता मा.न्यायालयानेही अँड.कपिल मोरे यांच्या युक्तिवादात तथ्य असल्याचे नमूद केले.मा.न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता अंतरिम संरक्षण अशा प्रकारे पुढे चालू ठेवता येणार नाही.त्यानंतर मा.न्यायमूर्ती आर.एम.जोशी यांनी आदेश देत ३० एप्रिल २०२४ रोजी आरोपी आयुब बनेमिया शेखला देण्यात आलेले अंतरिम संरक्षण रद्द केले आहे.

मा.न्यायालयाच्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे संबंधित गुन्ह्यात आरोपी आयुब शेखला मिळालेले न्यायालयीन संरक्षण आता संपुष्टात आले असून, पोलिस प्रशासनास कायद्यानुसार पुढील कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला असून कोणत्याही क्षणी आरोपीला अटक होणार असल्याची माहिती अँड. कपिल मोरे यांनी दिली आहे.

## आ. लंघे हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व : केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील हे सर्व जाती-धर्मातील नागरिकांना विश्वासात घेऊन, सर्वांना सोबत घेऊन चालणारे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या नेतृत्वाला आता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची ही भक्कम साथ असून नेवासा मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी ताकदीने उभे राहू अशी ग्वाही केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे श्रीरामपूरकडे जात असताना सोमवार, दि. २४ रोजी सकाळी ११ वाजता नेवासा फाटा येथील आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली.



यावेळी आ. विठ्ठलराव लंघे-पाटील यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री आठवले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले की, आ. विठ्ठलराव लंघे-पाटील यांची कार्यपद्धती सर्वसमावेशक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन काम करण्याची त्यांची भूमिका आहे. सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्रित करून मतदारसंघाच्या विकासाला प्राधान्य देणारे त्यांचे नेतृत्व आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया त्यांच्या सोबत असून त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाला आणखी भक्कम ताकद मिळाली आहे. देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार प्रभावीपणे काम करीत असून महाराष्ट्रातही महायुती सरकारच्या माध्यमातून विकासाची वाटचाल सुरू आहे.

महायुतीचा धर्म प्रामाणिकपणे पाळत राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते पूर्ण ताकदीने साथ देत आहेत, असेही केंद्रीय मंत्री आठवले यांनी यावेळी स्पष्ट केले. केंद्रीय मंत्री आठवले यांच्या या सदिच्छा भेटीदरम्यान आ. विठ्ठलराव लंघे-पाटील यांनी त्यांच्याशी नेवासा विधानसभा मतदारसंघासह विविध सामाजिक व विकासात्मक विषयांवर चर्चा केली. विशेषतः समाजातील वंचित, दुर्बल व मागास घटकांच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अधिकाधिक लाभ नेवासा तालुक्याला मिळावा, तसेच विविध विकासकामांना केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सहकार्य मिळावे, यासंदर्भातही सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, शिवसेनेचे नेते,भाऊसाहेब वाघ, रिपाईचे नेवासा तालुकाध्यक्ष सुशील धायजे, शहराध्यक्ष पप्पू इंगळे,जेष्ठ राजेंद्र वाघमारे, चंद्रकांत करडक, राम केंदळे, सुनील वाघमारे, अरुणराव मिसाळ, दयानंद खिलारी, सुरेशराव गायकवाड, संजय बनसोडे, नितीन भालेराव, विजय राजगुरू, नगरसेवक महेश लोखंडे, संदीप सरकाळे, प्रवीण सरोदे, अंकुश म्हस्के, निरंजन डहाळे, कृष्णा परदेशी,संतोष मोरे, अशोक राजगुरू, संदीप चाबुकस्वार, नितीन जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

## डॉ. सुजय विखेंची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काल दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी पक्षाच्या विविध प्रकोष्ठांच्या प्रभारी व सहप्रभारींच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. विखे पाटील यांच्याकडे पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. पक्ष संघटनेच्या कामात विविध स्तरांवर सक्रिय असलेल्या डॉ. विखे पाटील यांच्या कामाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आल्याचे पक्षातील कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आरोग्य, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने काम केले आहे. प्रदेश उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतरही त्यांनी पक्ष संघटनेच्या कामात सक्रिय सहभाग कायम ठेवला आहे. राज्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवत पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडण्यावर त्यांनी भर दिला आहे. आता आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदाची जबाबदारी मिळाल्याने केंद्र शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह प्रकोष्ठाचे काम राज्यभर अधिक प्रभावीपणे राबविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. प्रदेश उपाध्यक्षपदानंतर आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी झालेली ही नियुक्ती पक्ष नेतृत्वाचा त्यांच्यावरील विश्वास अधोरेखित करणारी असल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## अहिल्यानगरच्या महिला फुटबॉल संघाचा गोलांचा धडाका

### वर्धेवर १२–१ ने दणदणीत विजय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वरिष्ठ महिला संघाने वरिष्ठ महिला आंतरजिल्हा फुटबॉल राज्य अजिंक्यपद स्पर्धेत दिमाखदार सुरुवात केली. जळगाव येथे सुरू असलेल्या स्पर्धेत अहिल्यानगर संघाने वर्धा जिल्हा संघाचा तब्बल १२–१ गोलने पराभव करत स्पर्धेतील आपली आगेकूच कायम ठेवली. सोमवारी (२४ ऑगस्ट) झालेल्या सामन्यात अहिल्यानगरच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत वर्चस्व राखले. सुमय्या शेख हिने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत तब्बल सात गोल नोंदविले. तिच्या आक्रमक खेळामुळे वर्ध्याच्या बचावफळीवर सातत्याने दबाव निर्माण झाला.



तनिषा शिरसाठ हिने चार गोल करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली, तर निकिता रामावत हिने एक गोल केला. अहिल्यानगरच्या खेळाडूंनी वेगवान पासिंग, उत्कृष्ट सांघिक समन्वय आणि मिळालेल्या संधींचे अचूक गोलमध्ये रूपांतर करत प्रतिस्पर्धी संघाला सुरुवातीपासूनच बचावात्मक खेळ करण्यास भाग पाडले. २१ ते २६ ऑगस्टदरम्यान जळगाव येथे ही स्पर्धा होत आहे. गतवर्षी अहिल्यानगर संघाने उपविजेतेपद मिळविले होते. यंदा थेट विजेतेपद मिळविण्याचा निर्धार संघाने केला आहे.

संघाचे प्रशिक्षक प्रसाद पाटोळे, तर व्यवस्थापक प्रियंका सूर्यवंशी आहेत. संघाच्या कामगिरीबद्दल जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सचिव रोनप फर्नांडिस यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.

## बांधकाम कामगारांच्या खात्यावर १० कोटींचा लाभ, ८ हजार ५९५ प्रस्ताव मंजूर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना यश मिळाले असून, जानेवारी २०२५पासून आजपर्यंत तब्बल ८ हजार ५९५ बांधकाम कामगारांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. मंजूर झालेल्या या प्रस्तावांनुसार लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर १० कोटी १६ लाख ७३ हजार २८० रुपये इतकी रक्कम थेट वर्ग करण्यात आली आहे, त्यामुळे बांधकाम कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी कामगारांची नोंदणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रस्ताव दाखल करणे तसेच प्रस्तावांच्या मंजुरीची प्रक्रिया सुलभ करण्यावर भर देण्यात येत आहे.




बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत असून, अधिकाधिक कामगारांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव दाखल करावेत. बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी शासनाच्या माध्यमा तून विविध योजना राबविण्यात येत आहेत.शिक्षणासाठी मदत,सामाजिक सुरक्षा, आर्थिक सहाय्य तसेच कुटुंबीयांच्या गरजा लक्षात घेऊन विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना दिला जात आहे.

तालुक्यातील हजारो बांधकाम कामगारांच्या खात्यावर थेट आर्थिक मदत जमा झाल्याने त्यांच्या कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. पात्र बांधकाम कामगार शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी नोंदणीपासून ते प्रस्ताव मंजूर होऊन लाभाची रक्कम खात्यावर जमा होईपर्यंतच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही सुरू आहे.

अधिकाधिक कामगारांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार अमोल खताळ पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून बांधकाम कामगारांना मदत केली जात आहे त्यामुळे बांधकाम कामगारांनी आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहे